POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष-०५ ● अंक-३२२ ● मुंबई, रविवार, १४ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

भिवंडीत खोट्या एफडीए अधिकाऱ्यांचा सुळसुळाट

तुकाराम मुंढेंना समजल्यावर म्हणाले, 'कोणी सापडला तर...'

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक,

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये सध्या अन्न, औषध प्रशासन विभाग आणि त्याचे प्रमुख तुकाराम मुंढे यांच्या कार्यशैलीची जोरात चर्चा सुरु आहे. तुकाराम मुंढे ज्या विभागात जातील तिथे शिस्त लागेल, कायदा, सुव्यवस्थेचं पालन होईलं, असं त्यांच्याबाबत म्हटलं जातं. आता अन्न आणि औषध प्रशासन विभागात ते प्रत्यक्षात पाहायला मिळतं. पण त्यांच्या या लोकप्रियतेचा गैरफायदा घेण्याचे प्रकारही उजेडात येत आहेत. भिवंडीत अशा टोळीला पोलिसांनी जेरबंद केलंय. काय घडलंय नेमकं? सविस्तर जाणून घेऊया.

एफडीएच्या नावाने लूट

सरकारी अधिकाऱ्याचे नाव आणि पदाचा गैरवापर करून व्यापाऱ्यांना धमकावत लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या एका महिलेचा धक्कादायक प्रकार भिवंडीत उघडकीस आला आहे. अन्न व औषध प्रशासन विभागातील वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवून संबंधित महिलेने अनेक व्यापाऱ्यांकडून पैसे उकळल्याचा आरोप आहे. या प्रकरणामुळे व्यापारी वर्गात खळबळ उडाली असून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

बनावट ओळख तयार करून व्यापाऱ्यांना लक्ष्य

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला स्वतःला अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिकारी असल्याचे सांगत होती. काही ठिकाणी तिने वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संबंध असल्याचा दावा केला, तर काही व्यापाऱ्यांना कारवाईची भीती दाखवून संपर्क साधला. परवाने, तपासणी आणि नियमभंगाच्या नावाखाली व्यापाऱ्यांना दबावाखाली आणून आर्थिक फायदा मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे आरोप आहेत.

कारवाईची भीती दाखवून लाखो रुपयांची उकळपट्टी

महिलेने व्यापारी, दुकानदार आणि खाद्य व्यवसायिकांना एफडीए तपासणीचे कारण देत धमकावल्याची माहिती समोर आली आहे. "नियमांचे उल्लंघन झाले आहे", "कारवाई टाळायची असेल तर पैसे द्या" अशा प्रकारच्या दबावतंत्राचा वापर केल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. काही व्यापाऱ्यांनी भीतीपोटी पैसे दिल्याचेही समोर आले असून फसवणुकीची रक्कम लाखोंमध्ये गेल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.



तक्रारीनंतर प्रकरणाचा भंडाफोड

व्यापाऱ्यांना संशय आल्यानंतर काहींनी अधिकृत एफडीए कार्यालयाशी संपर्क साधला. चौकशीदरम्यान संबंधित महिला कोणत्याही सरकारी पदावर कार्यरत नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर प्रकरणाची माहिती पोलिसांना देण्यात आली. तक्रारीच्या आधारे तपास सुरू करण्यात आला आणि फसवणुकीचा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. या घटनेनंतर प्रशासनाने अशा बनावट व्यक्तींविषयी अधिक सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.



तुकाराम मुंढे यांनी दिला सतर्कतेचा इशारा

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. विभागाच्या नावाचा वापर करून कोणतीही व्यक्ती पैसे मागत असल्यास किंवा कारवाईची धमकी देत असल्यास त्वरित प्रशासनाशी संपर्क साधावा, असे त्यांनी स्पष्ट केले. एफडीए विभागाचे अधिकारी कोणत्याही प्रकारे वैयक्तिक आर्थिक व्यवहार करत नाहीत, असेही त्यांनी नमूद केले. नागरिकांनी अधिकृत ओळखपत्र आणि कागदपत्रांची पडताळणी केल्याशिवाय कोणावरही विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले.

बनावट सरकारी अधिकाऱ्यांच्या वाढत्या घटनांमुळे चिंता

अलीकडच्या काळात सरकारी अधिकारी, पोलीस, बँक कर्मचारी किंवा विविध विभागांचे प्रतिनिधी असल्याचे भासवून फसवणूक करणाऱ्यांच्या घटना वाढताना दिसत आहेत. डिजिटल व्यवहार आणि प्रशासनिक प्रक्रियांचा गैरफायदा घेत नागरिकांची फसवणूक केली जात आहे. भिवंडीतील ही घटना त्याच प्रकारातील गंभीर उदाहरण मानली जात आहे. या प्रकरणामुळे व्यापाऱ्यांनी आणि सर्वसामान्य नागरिकांनी कोणतीही आर्थिक देवाणघेवाण करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीची ओळख आणि अधिकाराची खातरजमा करणे आवश्यक असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू ठेवला असून फसवणुकीचे नेमके जाळे किती मोठे आहे, याचा शोध घेतला जात आहे. आणखी काही तक्रारी समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.

तुकाराम मुंढे यांना संरक्षण द्या; सामान्यांची मुख्यमंत्र्यांकडे थेट मागणी

विदर्भ, नाशिक, मुंबई या आणि अशा अनेक ठिकाणी गेल्या काही दिवसांपासून एकाच नावाची चर्चा आणि काहींमध्ये या नावाची दहशतसुद्धा पाहायला मिळत आहे. हे नाव म्हणजे अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी असणाऱ्या तुकाराम मुंढे यांचं. भेसळयुक्त अन्न, औषधं, गुटखा तस्करी आणि तत्सम अवैध व्यवसायांना आणि त्यामध्ये सहभागी असणाऱ्यांना चाप बसवण्यासाठी मुंढेंनी त्यांच्या कार्यशैलीला सुरुवात केली. कोट्यवधींचा भेसळयुक्त कच्चा माल असो किंवा चुकीची कामं करणाऱ्यांचे तळ असो, यंत्रणा हाताशी घेत तुकाराम मुंढे यांनी कारवायांचा धडाकाच लावला. पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या सात दिवसांमध्ये त्यांनी अशी काही कामगिरी केली, की राजकारण्यांवर चर्चा करणारी सामान्य मंडळी या अधिकाऱ्याच्या कामानं प्रचंड प्रभावित झाली. परिणामी सध्याचा चर्चेचा विषय, तुकाराम मुंढे! बेधडकपणे कारवाई करणाऱ्या त्यांच्या या शैलीला पाहता सामान्य नागरिकांचा सहभाग असणाऱ्या संघटनांनीसुद्धा त्यांना पाठिंबा दिला आहे. विदर्भातील ग्राहक पंचायतीकडून या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या समर्थनार्थ ठराव मंजूर करत त्यांना आवश्यक संरक्षण, कार्यपद्धतीत स्वातंत्र्य आणि प्रशासकीय पाठबळ देऊ करावं अशी मागणी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. सात दिवसांत 33 धाडी, 34 आस्थापना सील आणि 35 गुन्ह्यांची नोंद अशी आकडेवारीच मुंढे यांच्या कामाच्या पद्धतींचा वेग सांगत आहे. अशा स्थितीत त्यांना सामान्यांसह आता प्रशासनानंही साथ द्यावी अशी मागणी उचलून धरली जात आहे. तुकाराम मुंढे यांनी त्यांच्या अखत्यारित आलेल्या विभागाच्या कारवाईच्या माध्यमातून ग्राहक संरक्षण आणि सार्वजनिक आरोग्य अधिक बळकट होण्यास मोलाचं योगदान दिलं. हीच भावना ग्राहक पंचायतीनंही व्यक्त केली. त्यांच्या या कारवाईमुळं यामुळे खाद्यपदार्थांतील भेसळीला लगाम बसू शकेल. त्यामुळे शासनाने त्यांना संरक्षण द्यावं अशी मागणी करण्यात येत आहे. इतकंच नव्हे तर, प्रशासकीय संरक्षणाची करत अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करत ग्राहक संरक्षणाला प्राधान्य दिलं गेल्यानं ग्राहक पंचायतीने मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

पावसाचे संकट गहिरे

प्रशांत महासागरात १९५० नंतरचा सर्वाधिक शक्तिशाली ल निनो' सक्रिय, मान्सूनवर विपरीत परिणामाची शक्यता



■मुंबई । प्रतिनिधी,

येत्या २ ते ३ दिवसांत मान्सून महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, छत्तीसगड आणि उर्वरित ओदिशा-बिहारमध्ये अधिक प्रगती करण्यासाठी अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. दरम्यान, अमेरिकेची प्रख्यात हवामान संस्था 'नोआ' ने प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्याची अधिकृत घोषणा केली आहे. शास्त्रज्ञांच्या मते, यंदाचा एल निनो हा १९५० नंतरचा सर्वात तीव्र 'एल निनो' असण्याची ६३ टक्के शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळेभारतातील मान्सूनवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात आली आहे.

कारण विषुववृत्तीय प्रशांत महासागरात 'एल निनो'ची स्थिती निर्माण झाली आहे. ती पावसाळ्यात अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे, असे भारतीय हवामानशास्त्र विभागाने शुक्रवारी सांगितले. मान्सूनची वाटचाल मंदावण्यामागे 'एल निनो'ची अप्रत्यक्ष भूमिका महत्त्वाची मानली जात आहे. ढगांचे क्षेत्र असलेला 'मॅडन ज्युलियन ऑसिलेशन' हा घटक हिंदी महासागराऐवजी प्रशांत महासागरातच सक्रिय राहिल्याने मान्सूनची प्रगती रोखली गेली आहे. तसेच आखाती देशांकडून येणाऱ्या कोरड्या वाऱ्यांनीही पावसाला रोखून धरले आहे.

यंदा पाऊस अनियमित स्वरूपाचा

मान्सूनने शुक्रवारी बंगालच्या उपसागराचा वायव्य भाग, तसेच पश्चिम बंगाल, बिहार, ओदिशा आणि झारखंडचा काही भाग व्यापला आहे. मान्सूनची उत्तर सीमा सध्या महाराष्ट्रातील हरणे आणि सोलापूरसह हैदराबाद, भद्राद्री कोठागुडेम, कलिंगपट्टणम, पारादीप, बारीपाडा, पुरुलिया, धनबाद आणि मुझफ्फरपूर या भागातून जात आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, येत्या २ ते ३ दिवसांत मान्सून महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, छत्तीसगड आणि उर्वरित ओदिशा-बिहारमध्ये अधिक प्रगती करण्यासाठी अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा लक्षणीयरीत्या वाढल्यामुळे ही धोकादायक स्थिती उद्भवली आहे. याचा थेट आणि विपरीत परिणाम भारताच्या मान्सूनवर होण्याची दाट शक्यता असून, यंदा पाऊस सरासरीपेक्षा कमी किंवा अत्यंत अनियमित स्वरूपाचा राहू शकतो, ज्याचा मोठा फटका देशातील शेती व्यवसायाला बसण्याची चिन्हे आहेत.

अनियमित पावसाचा थेट शेतीला धोका

'एल निनो'च्या या प्रभावामुळे भारतात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी किंवा अत्यंत अनियमित राहण्याचा धोका आहे, ज्याचा थेट फटका शेतीला आणि खरीप हंगामाला बसू शकतो. भारतीय हवामान विभागाने यंदा सरासरीच्या ९० टक्के पावसाचा अंदाज वर्तवला आहे, ज्यामध्ये ५ टक्के कमी-अधिक तफावत असू शकते. एल निनोमुळे पावसाच्या प्रादेशिक वितरणात मोठी विषमता निर्माण होते. ज्या भागात नैसर्गिकरित्या कमी पाऊस पडतो, तिथे पावसाचे प्रमाण अधिक घटल्यास दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

प्रशांत महासागरातील तापमानात मोठी वाढ

हवामान खात्याने सांगितले की, विषुववृत्तीय प्रशांत महासागराच्या मोठ्या भागात महासागराच्या पृष्ठभागाखाली तापमानात लक्षणीय वाढ दिसून येत आहे. याचाच अर्थ आगामी महिन्यांत उबदार पाणी पृष्ठभागावर येत राहील आणि या स्थितीला अधिक मजबूत करेल. जून ते ऑगस्ट दरम्यान मध्य प्रशांत महासागरात पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील आणि जुलैपासून मध्य तसेच पूर्व प्रशांत महासागरात त्याचा विस्तार होऊन ते अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. हवामान मॉडेलचे ताजे संकेत दर्शवतात की नैऋत्य मान्सूनच्या बहुतांश काळात मध्यम ते तीव्र स्वरूपाची 'एल निनो' स्थिती राहील. 'एल निनो' ही एक नैसर्गिक हवामान पद्धती आहे, जी विषुववृत्तीय प्रशांत महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान नेहमीपेक्षा जास्त वाढण्याशी संबंधित आहे. भारतासाठी ऐतिहासिकदृष्ट्या याचा संबंध कमकुवत मान्सून, वाढलेले तापमान, पावसाचा मोठा खंड आणि काही वर्षांमध्ये दुष्काळाचा वाढता धोका याच्याशी जोडला गेला आहे. यापूर्वी २०२३ मध्ये 'एल निनो'ची स्थिती निर्माण झाली होती. तसेच २००० सालापासून विचार केला तर २००२, २००९ आणि २०१५ मध्ये अशा प्रकारची स्थिती उद्भवली होती.

पोलीस तपास सुरू

मुंबई : मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणात फक्त ११.७८ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून २० जूनपर्यंत वरुणराजाचे आगमन लांबणीवर पडल्याने मुंबईवर पाणी संकट गडद होत चालले आहे. यंदा १२ जून रोजी सातही धरणात १ लाख ७० हजार ५४१ दशलक्ष लिटर पाणीसाठा आहे. तर राज्य सरकारकडून २ लाख ३० हजार ५०० मिलियन लिटर राखीव साठा उपलब्ध करण्यात आला आहे. धरणातील पाणीसाठ्यात घट अन् पावसाची ओढ यामुळे मुंबईत पाणीबाणी परिस्थिती ओढावू शकते. त्यामुळे मुंबईत पाणीबाणी परिस्थिती टाळण्यासाठी आतापासून उपाययोजना करण्यात येत आहेत.

भारतीय हवाई दलाच्या विमानाचा भीषण अपघात

5 जवानांचा मृत्यू



■मुंबई । प्रतिनिधी,

आसाममधील जोरहाट हवाई दलाच्या तळावर शनिवारी एक मोठी दुर्घटना घडली. भारतीय हवाई दलाचे 'एएन-32' या मालवाहू विमानाचा लँडिंग करत असताना भीषण अपघात झाला. या दुर्दैवी अपघातात हवाई दलाच्या पाच जवानांचा मृत्यू झाला आहे, तर विमानाचे सह-पायलट या अपघातातून सुखरूप बचावले असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

का घडला अपघात?

प्राथमिक माहितीनुसार, जोरहाट हवाई दलाच्या तळावर उतरल्यानंतर विमानाने अचानक पेट घेतला. विमानाला आग लागल्याचे समजताच अग्निशामक दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी रवाना झाल्या आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले. अपघात घडल्याचे समजताच भारतीय हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि आवश्यक त्या आपत्कालीन उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली.

पाच जवानांचा मृत्यू

हवाई दलाने अधिकृत निवेदन जारी करून या अपघातात पाच जवानांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. मृत्यू झालेल्या जवानांमध्ये स्क्वॉड्रन लीडर प्रशांत सिंह, फ्लाईट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीरवायू खेमाराम कुमावत आणि अग्निवीरवायू दानिश आलम यांचा समावेश आहे. हवाई दलाने या शूर जवानांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून, या कठीण प्रसंगात हवाई दल शोकाकुल कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले.

'कृपया गुटखा मागू नका'

तुकाराम मुंढेंच्या कारवाईनंतर पानटपऱ्यांवर झळकले फलक



■मुंबई । प्रतिनिधी,

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी बेकायदा गुटखा व्यवसायाविरोधात सुरू केलेल्या धडक मोहिमेचे परिणाम आता भिवंडीत दिसू लागले आहेत. राज्यातील गुटखा पुरवठ्याचे महत्त्वाचे केंद्र मानल्या जाणाऱ्या भिवंडीत गुटखा व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेक पानटपऱ्यांवर ग्राहकांनी गुटखा किंवा पान मसाला मागू नये, असे फलक लावण्यात आले आहेत.

भिवंडीवर विशेष लक्ष

महाराष्ट्रात गुटखा आणि सुगंधित पान मसाल्यावर बंदी असतानाही अनेक वर्षांपासून त्याचा बेकायदा व्यापार सुरू असल्याचे समोर येत आहे. एफडीएने अलीकडेच उत्पादन, वाहतूक, साठवण आणि विक्री करणाऱ्या संपूर्ण साखळीवर कारवाईचा बडगा उगारला आहे. यंत्रमाग उद्योगासाठी प्रसिद्ध असलेले भिवंडी शहर गोदामे आणि लॉजिस्टिक नेटवर्कसाठीही ओळखले जाते. त्यामुळे गुटख्याच्या साठवणुकीसाठी आणि राज्यभर पुरवठ्यासाठी या शहराचा वापर होत असल्याचा संशय यंत्रणांना आहे.

मुंढेंचा दणका, पुरवठा साखळीवर दबाव


यापूर्वी कोट्यवधी रुपयांचा गुटखा जप्त झाला असला तरी कारवाई प्रामुख्याने चालक, वाहतूकदार किंवा खालच्या स्तरावरील व्यक्तींपर्यंतच मर्यादित राहत होती. मात्र तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर संपूर्ण पुरवठा साखळी उद्ध्वस्त करण्यावर भर दिल्याचे सांगितले जात आहे. यामुळे या व्यवसायाशी संबंधित अनेक जण सावध झाले असून काहींनी आपले व्यवहार कमी केल्याची चर्चा आहे. गुटखा तस्करीत सहभागी असलेल्या नेटवर्कमध्येही अस्वस्थता वाढल्याचे बोलले जात आहे.

नागरिकांकडून स्वागत

नागरिक आणि तंबाखूविरोधी कार्यकर्त्यांनी या मोहिमेचे स्वागत केले असून बेकायदा गुटखा व्यापारावर कायमस्वरूपी आळा बसावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एफडीएची कारवाई याच वेगाने सुरू राहिल्यास भिवंडीतील गुटखा साखळीला मोठा फटका बसू शकतो, असे मतही व्यक्त केले जात आहे.

पानटपऱ्यांवर इशाऱ्याचे फलक

या कारवाईचा परिणाम आता प्रत्यक्ष दिसू लागला आहे. भिवंडीतील अनेक पानटपऱ्यांवर "कृपया गुटखा किंवा पान मसाला मागू नका" असे फलक झळकत आहेत. दुकानदारही सध्या कोणताही धोका पत्करण्यास तयार नसल्याचे सांगत ग्राहकांना अशा उत्पादनांची मागणी करू नये, असे आवाहन करत आहेत.



FSSAIचा मोठा निर्णय

खाद्यपदार्थांच्या पॅकिंगसाठी स्टेपल पिन, धातूच्या तारांवर बंदी; अन्यथा होणार कारवाई

खाद्यपदार्थांमध्ये धातूचे तुकडे किंवा स्टेपल पिन आढळल्याच्या घटना समोर आल्यानंतर भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने कठोर पाऊल उचलले आहे. ग्राहकांच्या आरोग्याचा विचार करून खाद्यपदार्थांचे पॅकिंग आणि सीलिंग करताना स्टेपल पिन, धातूच्या तारा किंवा तत्सम धातूच्या साहित्याचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश तात्काळ लागू करण्यात आला आहे. *FSSAI*ने जारी केलेल्या निदेर्शानुसार, हॉटेल, रेस्टॉरंट, बेकरी, मिठाई दुकाने तसेच ऑनलाइन फूड डिलिव्हरीशी संबंधित अनेक आस्थापनांकडून पॅकिंगसाठी स्टेपल पिन आणि धातूच्या तारांचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले होते.

अन्नसुरक्षेला धोका

नियामक संस्थेने सांगितले की, केक, मिठाई, स्नॅक्स आणि इतर खाद्यपदार्थांच्या पॅकिंगमध्ये वापरल्या जाणाऱ्या धातूच्या पिन किंवा तारा चुकून अन्नामध्ये जाण्याचा धोका असतो. अशा वस्तू अन्नासोबत शरीरात गेल्यास गंभीर दुखापत होऊ शकते किंवा आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. याच पार्श्वभूमीवर सर्व अन्न व्यवसाय चालकांना खाद्यपदार्थांचे पॅकेट, फूड पार्सल किंवा टेकअवे ऑर्डर सील करण्यासाठी धातूच्या साहित्याचा वापर तात्काळ बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नियम मोडल्यास कारवाई

*FSSAI*ने स्पष्ट केले आहे की, या निदेशांचे पालन न करणाऱ्या हॉटेल, रेस्टॉरंट किंवा इतर अन्न व्यवसायांवर फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स ऑक्ट, २००६ अंतर्गत कारवाई केली जाऊ शकते. ग्राहकांच्या सुरक्षेला प्राधान्य अन्नपदार्थांचे पॅकिंग अधिक सुरक्षित करणे आणि ग्राहकांना अनावश्यक धोक्यांपासून वाचवणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे *FSSAI* ने म्हटले आहे. अन्नसुरक्षेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

भररस्त्यात शिपाईचा तरुणीवर कोयत्याने जीवघेणा हल्ला

8 वेळा जीवघेणा वार केला, प्रकृती चिंताजनक... सीसीटीव्ही व्हिडिओ समोर



■पालघर। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका माथेफिरूने एका महिला सरकारी कर्मचाऱ्यावर कोयत्याने हल्ला करून तिला गंभीर जखमी केले आहे. ही घटना शुक्रवारी 12 जून 2026 रोजी सायंकाळी 6.15च्या सुमारास घडली. जखमी महिलेची ओळख 27 वर्षीय स्नेहल सावंत अशी पटली असून, ती पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल विभागात कार्यरत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकारी कर्मचारी स्नेहल रस्त्यावरून चालत असताना, न्यायालयातील शिपाई अमोल मुळे नावाच्या एका व्यक्तीने मागून येऊन तिच्यावर अचानक कोयत्याने 8 वेळा हल्ला केला.

हल्लेखोराने महिलेच्या मानेवर, पाठीवर, खांद्यावर आणि कमरेवर अनेक वेळा वार करून तिला गंभीर जखमी केले. पोलीस आणि घटनास्थळी उपस्थित असलेल्यांच्या म्हणण्यानुसार, ती जमिनीवर पडल्यानंतरही आरोपीने तिच्यावर हल्ला सुरूच ठेवला. त्याने तिच्यावर अंदाजे आठ वेळा वार केले आणि त्यानंतर तो घटनास्थळावरून पळून गेला. ही संपूर्ण घटना जवळच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. हल्ल्यानंतर, आरोपी आपली बॅग आणि शस्त्र मागे सोडून पळून गेला.

लोकांनी तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर लगेचच, एका वाटसरूने जखमी महिलेला पाहून इतरांना सावध केले. अनेक लोक त्वरीत घटनास्थळी जमले आणि तिला रुग्णालयात नेण्यासाठी मदत केली. या घटनेच्या व्हिडिओमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. जखमी स्नेहल सावंत यांना सुरुवातीला पालघर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, परंतु त्यांची प्रकृती गंभीर असल्याने, चांगल्या उपचारांसाठी महिलेला दुसऱ्या रुग्णालयात पाठवण्यात आले.


मिळालेल्या माहितीनुसार, महिलेची प्रकृती अजूनही गंभीर आहे. घटनेची माहिती मिळताच पालघर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी तपास सुरू केला. फॉरेन्सिक टीमने घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावेही गोळा केले आहेत. पालघरचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांनीही घटनास्थळी भेट देऊन प्रकरणाचा आढावा घेतला. आरोपीला अटक करण्यासाठी पोलिसांनी विशेष शोधमोहीम सुरू केली आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

कर्तव्यकठोरतेला शोमनशिपचे ग्रहण!



प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे हे नाव ऐकले की डोळ्यासमोर उभी राहते ती एक कणखर, तत्त्वनिष्ठ आणि कोणत्याही दबावाला बळी न पडणारी व्यक्ती. भारतीय प्रशासकीय सेवेत अधिकारी अनेक येतात, पण आपल्या कार्यपद्धतीने व्यवस्थेला हादरा देणारे आणि सामान्य माणसाच्या मनात आशा निर्माण करणारे अधिकारी फार कमी असतात. मुंढे त्यापैकीच एक. मुंढे यांची कार्यपद्धती सरळ आहे. नियम तो नियम. त्यात तडजोड नाही. कायद्याचे पुस्तक हाच त्यांचा आधार. म्हणूनच जिथे जातात तिथे पहिल्या दिवसापासून बदल दिसू लागतो. कार्यालयात वेळेवर येणे, फाईली प्रलंबित न ठेवणे, भ्रष्टाचाराला थारा न देणे, नागरिकांशी थेट संवाद साधणे ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. सध्या ते अन्न व औषध प्रशासन विभागात आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. महाराष्ट्रात अन्न भेसळ हा गंभीर प्रश्न बनला आहे. दूध, तेल, मसाले, मिठाई अशा रोजच्या वस्तूंमध्ये भेसळ करून लोकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. मुंढे यांनी याविरोधात धडक मोहीम उघडली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात अचानक धाडी पडत आहेत. नाशिक, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त साठा जप्त झाला. अनेक हॉटेल्स, दूध डेअऱ्या, तेल गिरण्यांवर कारवाई झाली. विशेष म्हणजे ते फक्त छोट्या विक्रेत्यांवर कारवाई करत नाहीत, तर मोठ्या ब्रँड्सनाही सोडत नाहीत. 'कायदा सर्वांसाठी सारखा' हे ते कृतीतून दाखवत आहेत. त्यामुळे भेसळखोरांचे धाबे दणाणले आहे. ग्राहकांमध्ये आता थोडी सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, मात्र मुंढे यांच्या याच कडक शिस्तीचा दुसरा पैलू म्हणजे त्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्या. सोलापूर महापालिका, नवी मुंबई महापालिका, पीएमपीएमएल, नागपूर महापालिका अशा अनेक ठिकाणी त्यांनी काम केले. पण कुठेही त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाला नाही. सरासरी 8-10 महिन्यांत त्यांची बदली होते. कारण स्पष्ट आहे, राजकीय हस्तक्षेप आणि स्थानिक हितसंबंधांना त्यांची शिस्त मानवत नाही. रस्त्यावरील फेरीवाल्यांवरील कारवाई असो, अनधिकृत बांधकामांवर हातोडा असो, की कर्मचाऱ्यांच्या हजेरीबाबत नियम असो, मुंढे कुणालाच सूट देत नाहीत. त्यामुळे तक्रारींचा पाऊस पडतो आणि बदलीचा आदेश निघतो. येथे एक महत्त्वाचा मुद्दा येतो. अतिकडक असणे कधी कधी त्रासदायक ठरते. व्यवस्थेत शिस्त लावायची असेल तर फक्त दंडुका चालवून भागत नाही. लोकांना विश्वासात घ्यावे लागते, कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन बदल घडवावा लागतो. एकदम सगळे नियम लावले तर विरोध होतो. बदल घडवण्यासाठी सबुरी लागते. हळूहळू, टप्प्याटप्प्याने बदल केले तर तो टिकतो. मुंढे यांच्या कामाचा वेग वादळी आहे. पण वादळानंतर कधी कधी फक्त नुकसान उरते. जर त्यांनी आपल्या कडकपणासोबत थोडी सबुरी, थोडी रणनीती वापरली तर त्यांचे काम अधिक दीर्घकालीन परिणाम साधू शकेल. कारण शेवटी बदली झाली की त्यांनी सुरू केलेली कामे अर्धवट राहतात. पुढचा अधिकारी तीच तळमळ दाखवेल याची खात्री नसते. नवी मुंबईतील त्यांचे रस्ते रुंदीकरणाचे काम, नागपूरमधील स्वच्छतेचे मॉडेल हे बदलीनंतर थंडावले. त्यामुळे कडकपणासोबत सातत्य महत्त्वाचे. सातत्यासाठी पदावर टिकणे महत्त्वाचे. आणि टिकण्यासाठी सबुरीने घेणे महत्त्वाचे. सबुरी म्हणजे तडजोड नव्हे. कर्मचाऱ्यांना, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन, त्यांना बदलाचे भागीदार बनवून जर त्यांनी काम केले तर त्यांचे बदल्यांचे सत्र थांबेल. एका ठिकाणी 3-4 वर्षे टिकले तर ते त्या शहराचा, त्या विभागाचा चेहरामोहरा बदलू शकतात. त्यांची धडाडी, प्रामाणिकपणा आणि कायद्याचे ज्ञान याला सबुरीची जोड मिळाली तर ते महाराष्ट्रासाठी 'प्रशासकीय सुधारणांचे मॉडेल' ठरतील. खरे तर आज आपल्या व्यवस्थेला तुकाराम मुंढे यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची नितांत गरज आहे. जिथे सर्वत्र 'चलता है' वृत्ती आहे, तिथे 'चालणार नाही' म्हणणारा अधिकारी हवा. भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, दिरंगाई यांनी पोखरलेल्या व्यवस्थेवर मुंढे यांच्यासारखा 'सर्जिकल स्ट्राईक' करणारा डॉक्टर हवा. पण तो डॉक्टर जर प्रत्येक सहा महिन्यांनी बदलला तर ऑपरेशन पूर्ण कसे होणार? म्हणूनच समाजाने, माध्यमांनी आणि वरिष्ठ पातळीवरील प्रामाणिक नेतृत्वाने अशा अधिकाऱ्यांच्या पाठीशी उभे राहायला हवे. त्यांच्या बदल्या थांबवण्यासाठी आवाज उठवायला हवा. त्याचबरोबर मुंढे यांनीही व्यवस्थेचे राजकारण समजून घ्यावे. शेवटी व्यवस्था सुधारण्याचे उद्दिष्ट महत्त्वाचे असते. ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जर थोडी लवचिकता, थोडी सबुरी दाखवावी लागली तर तो पराभव नाही, ती शहाणपणाची खेळी ठरेल. मुंढे यांची निष्ठा वादातीत आहे. त्यांची तळमळ खरी आहे. आता गरज आहे ती 'कडकपणा अधिक सबुरी' या सूत्राची. हे जमले तर मुंढे फक्त 'बदली होणारे कर्तव्यदक्ष अधिकारी' न राहता 'व्यवस्था बदलणारे अधिकारी' ठरतील. मुंढे यांचा कामाचा धडाका हा लक्षवेधी असला तरी तो अल्पजीवी ठरतो, तो दीर्घकाळ चालून व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्याकडे त्यांचा कल दिसत नाही. सतत बदल्या होत राहणे हे आयएएस असलेल्या अधिकाऱ्याला भुषणावह नाही. एका रात्रीत लोकांच्या सवयी बदलत नसतात, त्यासाठी वेळ द्यावा लागते, रोम हे जगातील सुंदर शहर आहे, पण ते काही एका रात्री उभारले गेले नाही. मुंढे बदली झाली की, त्या ठिकाणी इतका धडाका लावतात की, सरकारला त्यांना दुसरीकडे बदली करणे भाग पडते. त्यामुळे मुंढेंना खरंच व्यवस्थेत सुधारणा घडवायची असते की, शोमनशिप करून काही काळ स्वतःकडे लोकांचे लक्ष वेधून पुढच्या प्रवासाला निघायचे असते, अशीही शंका उपस्थित झाल्यावाचून राहत नाही. शिक्षक कडक असावा, त्यामुळे मुलांना शिस्त लागेल, पण इतका कडक असू नये की, मुले त्याच्या भीतीने शाळेत येणेच बंद करतील.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा आणि सायबर गुन्हेगारी



डॉ. दीपक शिकारपूर एआय तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर गुन्हेगार चलाख पद्धतीने गुन्हे करत आहेत. गुन्हेगार संगणकाच्या पडद्यामागे बसून लाखो लोकांची माहिती चोरतात, बँक खाती रिकामी करतात, बनावट व्हिडीओ तयार करतात आणि उद्योगांना कोट्यवधी रुपयांचे नुकसान पोहोचवतात. सायबर गुन्हेगारीचे स्वरूप आता केवळ तांत्रिक राहिलेले नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेपुढील मोठे आव्हान बनले आहे.

आजचे जग पूर्णपणे डिजिटल झाले आहे. बँकिंग, शिक्षण, आरोग्य, व्यापार, शासन, संवाद, मनोरंजन, वाहतूक अशा प्रत्येक क्षेत्रात संगणक आणि इंटरनेटचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आला असून समाजमाध्यमे लोकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्र शिक्षण, क्लाऊड संगणन, इंटरनेट ऑफ थिंग्ज, मोठ्या प्रमाणातील माहिती विश्लेषण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवाचे जीवन अधिक वेगवान आणि सोयीस्कर झाले आहे. परंतु ज्या तंत्रज्ञानामुळे विकास साधला जात आहे, त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर गुन्हेगार अत्यंत धोकादायक आणि चलाख पद्धतीने गुन्हे करत आहेत. पूर्वी चोर घर फोडत असत, पाकीटमार गर्दीत चोरी करत असत; परंतु आता गुन्हेगार संगणकाच्या पडद्यामागे बसून लाखो लोकांची माहिती चोरतात, बँक खाती रिकामी करतात, बनावट व्हिडीओ तयार करतात, प्रतिष्ठा नष्ट करतात आणि उद्योगांना कोट्यवधी रुपयांचे नुकसान पोहोचवतात. सायबर गुन्हेगारीचे स्वरूप आता केवळ तांत्रिक राहिलेले नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेचे मोठे आव्हान बनले आहे.

सायबर गुन्हेगारी म्हणजे संगणक, इंटरनेट, मोबाईल, डिजिटल नेटवर्क किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करून केलेले गैरकृत्य. यामध्ये माहिती चोरी, आर्थिक फसवणूक, हॅकिंग, बनावट संकेतस्थळे, फिशिंग, मालवेअर, रॅन्समवेअर, समाजमाध्यमांवरील छळ, ओळख चोरी, डीपफेक, अश्लील सामग्री प्रसारित करणे, डिजिटल ब्लॅकमेलिंग, सायबर स्टॉकिंग अशा अनेक प्रकारांचा समावेश होतो. आज या सर्व प्रकारांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता एआय म्हणजे संगणकाला मानवी विचारसरणीप्रमाणे शिकण्याची, निर्णय घेण्याची आणि विश्लेषण करण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान. हे तंत्रज्ञान उद्योग, वैद्यकीय क्षेत्र, शेती, शिक्षण, संशोधन यासाठी अत्यंत उपयुक्त आहे; परंतु सायबर गुन्हेगारांनी त्याचा दुरुपयोग सुरू केला आहे. आज फिशिंग म्हणजेच सावज हेरण्यासाठी केले जाणारे हल्ले अधिक धोकादायक झाले आहेत. पूर्वी फसवणूक करणाऱ्या ईमेल व्याकरणदृष्ट्या चुकीच्या आणि सहज ओळखता येण्यासारख्या असत. आता कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून केलेल्या ईमेल अत्यंत विश्वासार्ह वाटतात. या मेल संबंधित व्यक्तीच्या नावाने, कार्यालयाच्या शैलीत किंवा बँकेच्या अधिकृत भाषेत लिहिलेल्या असतात. गुन्हेगार समाजमाध्यमांवरील माहिती, नोकरीचे तपशील, मित्रपरिवार, आवडी-निवडी यांचा अभ्यास करून अत्यंत वैयक्तिक स्वरूपाचे संदेश पाठवतात. त्यामुळे सामान्य व्यक्ती सहज फसते.

भारतामध्ये अनेक नागरिकांना 'तुमचे बँक खाते बंद होणार आहे', 'केवायसी अपडेट करा', 'तुम्ही लॉटरी जिंकली आहे' किंवा 'तुमच्या खात्यातून पैसे कापले गेले' अशा संदेशांद्वारे फसवले जाते. काही प्रकरणांमध्ये बनावट ग्राहक सेवा क्रमांक तयार करून लोकांकडून दूरध्वनीद्वारे गुप्त माहिती मिळवली जाते. अलीकडील काळात भारतातील अनेक शहरांमध्ये 'डिजिटल अरेस्ट'चे प्रकार समोर आले. पोलीस, अंमलबजावणी अधिकारी किंवा न्यायालयीन अधिकारी असल्याचे भासवून गुन्हेगार नागरिकांना घाबरवतात आणि ऑनलाईन पैसे उकळतात. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तयार होणारे 'डीपफेक' हे आधुनिक काळातील सर्वात मोठे संकट मानले जात आहे. डीपफेक तंत्रज्ञानाद्वारे एखाद्या व्यक्तीचा चेहरा, आवाज किंवा हालचाली हुबेहूब नक्कल करून बनावट व्हिडीओ किंवा ध्वनिफीत तयार करता येते. काही महिन्यांपूर्वी भारतातील अनेक प्रसिद्ध कलाकार आणि उद्योजक यांच्या नावाने समाजमाध्यमांवर बनावट व्हिडीओ प्रसारित झाले होते. काही गुन्हेगारांनी उद्योगपतींच्या आवाजाची नक्कल करून कर्मचाऱ्यांना आर्थिक व्यवहार करण्याचे आदेश दिले. परदेशात एका कंपनीच्या अधिकाऱ्याला त्याच्या वरिष्ठांचा बनावट आवाज ऐकवून लाखो डॉलर्सची फसवणूक करण्यात आली होती. अशा घटना भारतातही वाढू लागल्या आहेत. महिलांविरोधातील सायबर गुन्ह्यांमध्येही डीपफेक आणि मॉर्फिंगचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. समाजमाध्यमांवरील फोटो वापरून बनावट अश्लील चित्रफिती तयार केल्या जातात आणि त्याद्वारे ब्लॅकमेल केले जाते. विद्यार्थिनी, व्यावसायिक महिला, कलाकार आणि सार्वजनिक जीवनातील व्यक्ती या विशेषतः या प्रकाराला बळी पडतात. अशा प्रकारांमुळे मानसिक ताण, सामाजिक अपमान आणि आत्महत्येसारख्या घटना घडण्याचा धोका वाढतो. रॅन्समवेअर हा आणखी एक गंभीर सायबर हल्ला आहे. यामध्ये संगणकातील माहिती हडप केली जाते आणि ती पुन्हा मिळवण्यासाठी खंडणी मागितली जाते. रुग्णालये, बँका, उद्योग, सरकारी कार्यालये यांच्यावर अशा हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. भारतातील काही मोठ्या रुग्णालयांच्या संगणक प्रणालींवर हल्ले झाल्याने रुग्णसेवा विस्कळीत झाली होती. काही वर्षांपूर्वी देशातील एका प्रमुख वैद्यकीय संस्थेची माहिती प्रणाली ठप्प होऊन हजारो रुग्णांची माहिती धोक्यात आली होती. अशा घटनांमुळे राष्ट्रीय सुरक्षेलाही धोका निर्माण होतो. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे पासवर्ड फोडण्याची प्रक्रिया शक्य आणि वेगवान झाली आहे. अनेक लोक जन्मतारीख, मोबाईल क्रमांक किंवा साधे शब्द पासवर्ड म्हणून वापरतात. कृत्रिम बुद्धिमत्ता काही क्षणांमध्ये लाखो संभाव्य संयोजनांचा अभ्यास करून योग्य पासवर्ड शोधू शकते. बॉट्सच्या मदतीने ताशी हजारो प्रयत्न केले जातात. त्यामुळे दुबळे पासवर्ड वापरणारे खाते सहज हॅक होते.

समाजमाध्यमे ही सायबर गुन्हेगारांसाठी मोठी शस्त्रे बनली आहेत. एखाद्या व्यक्तीची जीवनशैली, मित्रपरिवार, कार्यालय, प्रवास, आर्थिक स्थिती याबाबतची माहिती सहज उपलब्ध होते. गुन्हेगार या माहितीचा वापर करून भावनिक किंवा आर्थिक फसवणूक करतात. काहीजण खोट्या प्रोफाइलद्वारे मैत्री करतात, विश्वास संपादन करतात आणि नंतर पैशांची मागणी करतात. 'ऑनलाईन प्रेमसंबंध' आणि 'गुंतवणूक सल्ला' या नावाखाली मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. क्रिप्टोकरन्सी आणि ऑनलाईन गुंतवणूक योजनांमुळेही नवीन प्रकारची सायबर गुन्हेगारी वाढली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने बनावट गुंतवणूक संकेतस्थळे, बनावट नफा दाखवणारे आकडे आणि खोटे ग्राहक अभिप्राय तयार केले जातात. लोकांना अल्पावधीत मोठा नफा मिळेल असे सांगून पैसे गुंतवायला भाग पाडले जाते. एकदा पैसे जमा झाले की संकेतस्थळ गायब होते. इंटरनेट ऑफ थिंग्जमुळे घरातील अनेक उपकरणे इंटरनेटशी जोडली गेली आहेत. स्मार्ट दूरचित्रवाणी, सुरक्षा कॅमेरे, स्मार्ट कुलपे, रेफ्रिजरेटर, आवाजावर चालणारी उपकरणे यांमध्ये पुरेशी सुरक्षा नसल्यास गैरवापर होऊ शकतो. गुन्हेगार या उपकरणांमध्ये प्रवेश मिळवून घरातील हालचालींची माहिती मिळवून मोठ्या प्रमाणावर सायबर हल्ले करण्यासाठी त्यांचा वापर करू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून दिशाभूल करणारी माहितीही मोठ्या प्रमाणावर पसरवली जाते. निवडणुका, धार्मिक प्रश्न किंवा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित संवेदनशील मुद्द्यांवर बनावट संदेश आणि व्हिडीओ प्रसारित करुन समाजात भीती, द्वेष आणि अस्थिरता निर्माण केलीजाऊ शकते.

सायबर गुन्ह्यांविरोधात कायदे असले तरी तंत्रज्ञानाचा वेग खूप मोठा आहे. गुन्हेगार अनेकदा परदेशातून काम करतात. तेव्हा ओळख लपवण्यासाठी व्हर्च्युअल नेटवर्क, बनावट उपकरणे आणि गुप्त तंत्रांचा वापर केला जातो. त्यामुळे तपास यंत्रणांसमोर मोठे आव्हान उभे राहते. या परिस्थितीत केवळ सरकार किंवा पोलीस यंत्रणा पुरेशा नाहीत. प्रत्येक नागरिकाने सायबर सुरक्षेबाबत जागरूक होणे आवश्यक आहे. कोणत्याही अनोळखी दुव्यावर क्लिक करू नये, बँक माहिती किंवा संकेतशब्द कोणालाही सांगू नयेत, समाजमाध्यमांवर अतिवैयक्तिक माहिती शेअर करू नये, मजबूत संकेतशब्द वापरावेत. शैक्षणिक संस्था, उद्योग आणि शासन यांनीही आधुनिक सुरक्षाप्रणाली वापरणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुरक्षा साधने, माहिती सांकेतिकीकरण, नियमित बॅकअप, सुरक्षा तपासणी आणि कर्मचारी प्रशिक्षण यामुळे धोका कमी करता येतो. भारत सरकारने राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण, सायबर गुन्हे तक्रार पोर्टल आणि डिजिटल सुरक्षा मोहिमा सुरू केल्या आहेत. तरीही सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानामुळे कायम सतर्कता ठेवावी लागणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवजातीसाठी अत्यंत शक्तिशाली आणि उपयुक्त निर्मिती आहे; परंतु या तंत्रज्ञानाचा विकास ज्या वेगाने होत आहे, त्याच वेगाने सायबर गुन्हेगारही चलाख आणि धोकादायक होत आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर, डिजिटल साक्षरता, मजबूत कायदे आणि जागतिक सहकार्य ही काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. सायबर सुरक्षितता ही आता केवळ तांत्रिक बाब राहिलेली नाही; तर प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी, प्रतिष्ठेशी आणि देशाच्या सुरक्षेशी जोडलेली आहे. म्हणूनच तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर करणे आवश्यकआहे.

भारतात प्लास्टिकच्या नोटांचा पायलट प्रोजेक्ट!



नोटांच्या छपाईवरील खर्च कमी करून बनावट नोटांना लगाम घालण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक पॉलीमर-प्लास्टिकच्या नोटांची छपाई करण्याचा गांभीयार्नं विचार करतंय. या नोटा चलनात आल्यास फाटर्णाया, चुरगळर्णाया नोटांच्या त्रासापासून भारतीय नागरिकांचीही सुटका होईल. तसेच देशातील बनावट नोटांच्या सीमेवरील पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश हे या नोटांचे लँडिंग स्पॉट आहेत. पुढं भारतीय हँडलर्स व कॅरिअर्स अत्यंत चलाखीनं रोख रकमेचा जास्त व्यवहार असणारी ठिकाणं निवडतात. भाजी मंडई, सोने बाजार, पेट्रोल पंप, गदीर्ची दुकानं हेरून खंया नोटांच्या बंडलांमध्ये मिसळून या बनावट नोटा भारतीय अर्थव्यवस्थेत पेरल्या जातात.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) सध्या भारतात कागदी नोटांऐवजी पॉलीमर म्हणजेच प्लास्टिकच्या नोटा चलनात आणण्याचा अत्यंत सीरियसली विचार करतंय. आरबीआयच्या संचालक मंडळाच्या बैठकांमध्ये नव्या चलनावर विचारविनिमय झाल्याचं समजतं. त्यानुसार, देशात लवकरच १० आणि २० रुपयांच्या पॉलीमर नोटांसाठी एक ह्यपायलट प्रोजेक्टह्ण राबवण्यात येऊ शकतो. या नोटा सध्याच्या कागदी नोटांपेक्षा अधिक टिकाऊ आणि सुरक्षित असल्याचं म्हटलं जातंय. मागच्या दशकभरात भारतात डिजिटल आर्थिक व्यवहारांमध्ये प्रचंड वृद्धी झालीय. ऑनलाईन बँकिंगपासून ते युपीआय आयडी, क्यूआर कोडने पेमेंट करण्यापर्यंतचे बहुतांश आर्थिक व्यवहार आपण डिजिटली करू लागलोय. तरीही देशात मोठ्या प्रमाणात चलनी नोटांचा वापर होतोय. अजूनही भारतीय बाजारात रोख रकमेची मागणी विक्रमी पातळीवर आहे. बँकेतून किंवा एटीएममधून करकरीत नोटा हाती येतात खंया. परंतु देवाणघेवाणीच्या व्यवहारांमध्ये या नोटांचा करकरीतपणा जाऊन त्या नरम पडतात, एकाच्या हातातून दुर्सयाच्या हातात फिरर्णाया नोटा कधी कुणाच्या पाकिटात, तर कधी कुणाच्या खिशात विसावतात. घामानं भिजून चुरगळतात किंवा दुमडल्यामुळं मधोमध अथवा कोर्पयातून फाटतात. कपड्यांसोबत वॉशिंग मशीनमध्ये धुतल्या जाण्याचे प्रकारही अधूनमधून घडतात. पावसाळ्यात कागदी नोटा भिजून खराब होण्याचं प्रमाण तर खूपच असतं. त्यामुळं या नोटा प्लास्टिकच्या पिशवीत ठेवणं किंवा पाण्यानं भिजल्यानंतर त्यावर इस्त्री फिरवून कडक करणं असे उपाय आपण करत असतो.

भारतात वापरल्या जार्णाया कागदी नोटा खूपच लवकर जुन्या होतात किंवा खराब होऊन फाटतात. कागदी नोटांची छपाई करणं आणि खराब झालेल्या नोटा नष्ट करण्याचा खर्च आरबीआयसाठी मोठा भार ठरतोय. आरबीआयच्या ताज्या वार्षिक अहवालानुसार, 2025-26 या आर्थिक वर्षात आरबीआयला नव्या नोटांच्या छपाईसाठी 4,875.2 कोटी इतका खर्च आला होता. त्याआधीच्या आर्थिक वर्षात (2024-25) हाच खर्च सुमारे 25 टक्क्यांनी वाढून 6,372.8 कोटीवर पोहोचला होता. परंतु त्यानंतर नोटांची मागणी काहीशी कमी झाल्यानं हा खर्च थोडा घटला. भारतात मुख्यतः 500 च्या नोटांची छपाई सर्वाधिक होते, कारण बाजारात मूल्याच्या दृष्टीने सुमारे 86 टक्क्यांपेक्षा जास्त वाटा याच नोटांचा आहे. एका माहितीनुसार, 10, 100, 500 अशा वेगवेगळ्या मूल्याच्या एका नोटेच्या छपाईसाठी आरबीआयला साधारणपणे 1 ते 3 रुपयांपर्यंत खर्च येतो.

तर, याउलट आरबीआय दरवर्षी बाजारातून तब्बल २,१०० ते २,३०० कोटींहून अधिक जुन्या, फाटलेल्या आणि खराब झालेल्या नोटा (सॉइल्ड बँकनोट्स) चलनातून बाहेर काढते. यामध्येही 500 आणि 100 रुपयांच्या नोटांचं प्रमाण जास्त असतं. पूर्वी या नोटा गोळा करून त्या जाळल्या जायच्या. परंतु, आता पर्यावरणाचा विचार करून या नोटा नष्ट करण्यासाठी ह्याकरन्सी व्हेरिफिकेशन अँड प्रोसेसिंग सिस्टमह्ण वापरली जाते. आरबीआयच्या विविध कार्यालयांमध्ये ही मशीन असते. या मशीनद्वारे खराब नोटांचे बारीक तुकडे केले जातात. हे तुकडे रिसायकल करून औद्योगिक कामांसाठी वापरले जातात. जुन्या नोटा गोळा करणे, त्यांची तपासणी करणे आणि या नोटा नष्ट करण्यासाठी आरबीआयला मोठा खर्च येतोच. हा खर्च टाळण्यासाठी आरबीआय मागच्या काही वर्षांपासून विविध पर्याय चाचपडून बघत आहे. त्यातलाच एक पर्याय म्हणजे धातूच्या नाण्यांचा. मध्यंतरी आरबीआयने 1, 2 आणि 5 रुपयांच्या नाण्यांसोबतच 10 आणि 20 रुपयांची नाणी मोठ्या प्रमाणावर बाजारात आणली होती. परंतु ही नाणी खिसा, पाकिटात बाळगायला अडचण यायची. 10-20 रुपयांच्या नाण्यांचे एकसारखे आकार असल्यानं गल्लत व्हायची. यामुळं नागरिक आणि व्यापार्यांनी ही नाणी वापरण्यास फारसा उत्साह दाखवला नाही. त्यामुळं आरबीआयला यू टर्न घ्यावा लागला.

आरबीआयनं 2012 साली कोची, म्हैसूर, जयपूर, भुवनेश्वर आणि शिमला या 5 शहरांमध्ये प्लास्टिकच्या नोटांची चाचणी घेण्याचं ठरवलं होतं. परंतु, तेव्हा एटीएम मशीन या नोटा ओळखण्यास आणि मोजण्यास सक्षम नव्हत्या तसंच या नोटा हाताळण्यात काही तांत्रिक अडचणी आल्यानं हा निर्णय लांबणीवर पडला होता. परंतु आता हे तांत्रिक अडथळे पूर्णपणे दूर झाले असून आधुनिक एटीएम मशीन्स आणि बँकिंग प्रणाली प्लास्टिक/पॉलीमरच्या नोटा हाताळण्यास सक्षम झाल्या आहेत. त्यामुळं आरबीआय पुन्हा एकदा या नोटांचा गांभीयार्नं विचार करू लागलीय. प्लास्टिक/पॉलीमरच्या नोटा छापण्यामागं सुरक्षा हे दुसरं महत्त्वाचं कारण आहे. नुकताच ह्यधुरंधरह्ण नावाचा सिनेमा बॉक्स ऑफिसवर प्रचंड यशस्वी ठरला. या सिनेमात आयएसआयचा मेजर इक्बाल, खनानी ब्रदर्स नावाचे पाकिस्तानी एजंट्स भारतीय चलनी नोटांच्या प्लेट्स चोरतात आणि नंतर कोट्यवधी रुपये मूल्याच्या बनावट भारतीय नोटा पाकिस्तानात छापून त्या भारतात घुसवताना दाखवलं होतं. यातली बहुतांश दृश्ये काल्पनिक असली, तरी भारतात बनावट नोटांची घुसखोरी हा खूप जुना आणि आरबीआयच्या चिंतेचा विषय आहे.

भारतात नेमक्या किती कोटींच्या बनावट नोटा येतात याचा अचूक आकडा सांगणं कठीण आहे. कारण बँका आणि सुरक्षा यंत्रणांकडून पकडल्या जार्णाया नोटा हिमनगाचं केवळ एक टोक आहे. मात्र, राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि गुप्तचर विभागांच्या अंदाजानुसार दरवर्षी शेकडो कोटींच्या बनावट नोटा भारतीय अर्थव्यवस्थेत पेरल्या जातात. आरबीआयच्या 2024-25 च्या एका अहवालानुसार, बँकिंग प्रणालीमध्ये 2.17 लाख कोटी रुपये मूल्याच्या बनावट नोटा सापडल्या होत्या. तर, 2023-24 मध्ये 2.23 लाख कोटींच्या बनावट नोटा हाती लागल्या होत्या. यापैकी 500 रुपयांच्या बनावट नोटांमध्ये 37.3 टक्के आणि 200 रुपयांच्या बनावट नोटांमध्ये 13.9 टक्क्यांनी वाढ झाल्याचं म्हटलं होतं.

भारतीय चलनी नोटांचं डिझाईन आणि छपाई पूर्णपणे केंद्र सरकार आणि आरबीआयच्या नियंत्रणाखाली होतं. यासाठी कोणत्याही परदेशी कंपनीला थेट छपाईचं कंत्राट दिलं जात नाही. देशात फक्त चारच ठिकाणी नाशिक (महाराष्ट्र), देवास (मध्य प्रदेश), हैसूर (कर्नाटक) आणि सालबोनी (पश्चिम बंगाल) इथल्या सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसमध्ये ही छपाई होते. पूर्वी सुरक्षेसाठी वापरला जाणारा विशेष कागद, सुरक्षा धागा अर्थात सिक्युरिटी थ्रेड आणि रंग बदलणारी शाई स्वित्झर्लंड, जर्मनी आणि ब्रिटनच्या कंपन्यांकडून आयात केली जात होती. मात्र आता ह्यमेक इन इंडियाह्ण अंतर्गत होशंगाबाद आणि म्हैसूर इथल्या ह्यबँक नोट पेपर मिलह्णमध्येच बहुतांश सिक्युरिटी कागद तयार होतो आणि नोटांचं डिझाईनही आरबीआयच्या इन-हाऊस टीमकडूनच केलं जातं.

तरीही पाकिस्तानी एजंट्स सिक्युरिटी थ्रेड, वॉटर मार्क, रंग बदणारी शाई यामध्ये फेरफार करत उच्च प्रतीचे स्कॅनर्स आणि प्रिंटर्स वापरून बनावट भारतीय नोटा छापतात. या नोटांवर महात्मा गांधीजींच्या वॉटर मार्कऐवजी तेल किंवा फिकट पांढरया शाईचा शिक्का मारलेला असतो, खंया नोटेत सुरक्षा धागा कागदाच्या आत विणलेला असतो. तर, बनावट नोटेत दोन पातळ कागदांमध्ये चंदेरी पट्टी टाकून ते चिकटवले जातात. खंया नोटांवरील उठावदार फोटो, अशोक स्तंभाऐवजी बनावट नोटेत लेझर प्रिंटरचा वापर करून शाईचा जाड थर दिला जातो. अशा प्रकारे सेफ्टी फिचर तोडून हुबेहूब बनावट नोटा तयार केल्या जातात. या नोटा भारतात पोहोचण्यामागं पाकिस्तानी आणि भारतीय गुन्हेगारांच्या नेटवर्कचा मोठा रोल असतो. या नोटा पाकिस्तानातून नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, थायलंड आणि दुबई या मार्गांनी भारतीय हँडलर्समार्फत देशात पोहोचतात. नेपाळ, बांगलादेशच्या सीमेवरील पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश हे या नोटांचे लँडिंग स्पॉट आहेत. पुढं भारतीय हँडलर्स व कॅरिअर्स अत्यंत चलाखीनं रोख रकमेचा जास्त व्यवहार असणारी ठिकाणं निवडतात. भाजी मंडई, सोने बाजार, पेट्रोल पंप, गदीर्ची दुकानं हेरून खंया नोटांच्या बंडलांमध्ये मिसळून या बनावट नोटा भारतीय अर्थव्यवस्थेत पेरल्या जातात.

बनावट नोटांचा बाजारात पुरवठा वाढवून खंया पैशांचं मूल्य कमी करणं, देशात महागाई वाढवून भारताची अर्थव्यवस्था खिळखिळी करणं यासाठी आयएसआय ही पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणा तस्कर, एजंट्स, हँडलर्सच्या मदतीनं हे खेळ खळत असते. याच पैशांचा वापर अमली पदार्थांची तस्करी, अवैध शस्त्रे खरेदी आणि दहशतवादी कारवायांसाठी केला जातो. त्यातून काळा पैसा आणि गुन्हेगारीला बळ दिलं जातं. भारताचा आर्थिक विकास रोखणं आणि देशविघातक कारवायांना रसद पुरवणं हे यामागचं प्रमुख षड्यंत्र आहे. यावर मात करण्यासाठी आरबीआय सातत्यानं सिक्युरिटी फीचर्स अपग्रेड करणं, जुन्या नोटा चलनातून बाद करण्याचे निर्णय घेत असते. मात्र, प्लास्टिक/पॉलीमरच्या नोटा चलनात आल्यास यातील बर्याच कटकटी दूर होतील असं आरबीआयला वाटतंय. पॉलीमरच्या नोटा छापायला महाग असल्या तरी त्या टिकाऊ असल्यानं पुन्हा पुन्हा छापण्याची गरज पडत नाही. त्यामुळं दीर्घकालीन छपाई खर्च वाचू शकतो. जुन्या नोटा कागदी नोटांच्या तुलनेत पॉलीमर नोटा 2.5 ते 4 पट जास्त काळ टिकतात. कागदी नोटा जिथं 1 ते 2 वर्षे टिकतात, तिथं प्लास्टिकच्या नोटा 7 वर्षांपेक्षा जास्त काळ उत्तम स्थितीत राहू शकतात. या नोटा वॉटरप्रूफ असतात. त्यामुळं कागदी नोटांसारख्या पाण्यात भिजून फाटत नाहीत

शेवयांचा उपमा

सकाळचा नाश्ता म्हटले की, पोहे, उपमा, शिरा हे ठरावीक पदार्थ खायला मिळतात. एका सकाळी आपल्याला शेवयांचा उपमा करता येईल. खवय्यांना आवडेल अशी ही स्वादिष्ट डिश आहे.

साहित्य : शेवया, नारळ, मटार, चणाडाळ, टोमॅटो, लाल मिरची, गोडेतेल, कढीपत्ता, कांदे, मोहरी, हिंग, मीठ, जिरे.

कृती : कढईत शेवयांचा चुरा तांबूस रंग येईपर्यंत भाजा. भाजताना तेल नको. पाणी गरम करून ठेवा. एका पातेल्यात तेल गरम करून त्यात हिंग, मोहरी, जिरे, मिरच्यांचे तुकडे, कढीपत्ता, भिजलेली डाळ, कांदा, हळद सर्व टाकून लालसर होईपर्यंत परतून घ्यावे. त्यात गरम केलेले पाणी टाकून मीठ टाकावे. चवीला साखर, कोथिंबीर, नारळाचा चव घालून उकळावे. उकळलेल्या पाण्यात भाजलेल्या शेवयांचा चुरा घालावा व त्या शिजवाव्यात.



आपणासदेखील असं वाटत की आपले वय कमी आहे, पण सुरकुत्यांमुळे चेहऱ्यावरील चार्म गमावत आहे, तर त्यामागे बरीच कारणे असू शकतात. चला तर मग चेहऱ्यावर सुरकुत्या होण्यामागील कारणे जाणून घेऊया. सुरकुत्या सरत्या वयाचा एक भाग आहे. कॉलेजनचे उत्पादन वेळेनुसार कमी होतं, ज्यामुळे आपली त्वचा लवचिकता गमावून बसते. सरत्या वयासह सुरकुत्या होणे स्वाभाविकच आहे, पण अशी अनेक कारणे आहेत ज्यामुळे अकालीच सुरकुत्या दिसू लागतात. यामधील काही तर आपल्या दररोजच्या सवयीमुळे देखील असू शकत. जसे की साखरेचे सेवन किंवा सूर्याच्या प्रकाशात जास्त काळ राहिल्यामुळे आपल्या त्वचेवर फाईन लाइन्स दिसू लागतात. तथापि अद्याप उशीर झालेला नाही. आपण इच्छित असल्यास आपल्या दिनचर्येत आवश्यक बदल करून या सुरकुत्यांना चेहऱ्यावर येण्यापासून रोखू शकता.



चेहऱ्यावर सुरकुत्या होण्या मागील मुख्य ७ कारणे

आपल्या त्वचेला घासणे : जर आपण जोराने आपल्या चेहऱ्याला मेकअप वाईप किंवा टॉवेलने चोळत असाल किंवा आयलायनर लावण्यासाठी आपल्या डोळ्याच्या भोवतीच्या त्वचेला ताणत असाल, तर यामुळे देखील सुरकुत्या येऊ शकतात. वारंवार असे करण्याची सवय आपल्या त्वचेसाठी नुकसानदायी होऊ शकते.

पुरेशी झोप न घेणं : आपण झोप घेता त्यावेळी कॉर्टिसॉल(तणावाचे हार्मोन)ची पातळी स्वाभाविकरीत्या कमी होते. हे आपल्या त्वचेला दिवसभराच्या तणावापासून मुक्त होण्यासाठी नैसर्गिकरीत्या त्वचेला या चक्रातून जाऊ देतं. जर आपल्याला आवश्यक सौंदर्यवर्धक झोप मिळत नसेल तर आपण या चक्रात व्यत्यय आणत आहात. कॉर्टिसॉलचे उच्च स्तर कॉलेजन तोडून सुरकुत्या वाढवतात.

प्रदूषण : आपल्या सर्वांसाठी प्रदूषणाची वाढती पातळी वाईट आहे, हे तर सर्वांनाच माहीत आहे. धूर, धूळ आणि धुकं यापासून त्वचेच्या फ्री रॅडिकल्सला नुकसान होतं. यामुळे अकाली वृद्धत्व आणि सुरकुत्या येऊ लागतात. नकारात्मक प्रभावाला कमी करण्यासाठी दिवसाच्या शेवटी आपल्या चेहऱ्याला स्वच्छ करावे.

आपली झोपण्याची स्थिती : जर आपल्याला पोटावर किंवा हाताला उशीखाली दाबून झोपण्याची सवय असल्यास, बराच काळ असे केल्यानं आपल्या चेहऱ्यावर काही डाग येऊ शकतात. याचा परिणाम रात्रभर दिसून येत नाही, पण नंतर लक्षात येतो. यापासून वाचण्यासाठी पाठीवर झोपण्याचा प्रयत्न करा आणि त्वचेच्या सुरकुत्यांना कमी करण्यासाठी रेशीम किंवा सॅटिनची उशी वापरा.

उच्च साखरयुक्त आहार घेणं :



साखर आपले वजन वाढवण्यात आणि त्वचेला अकाली वृद्ध करण्यात योगदान देते. साखर विरघळल्यावर ही ग्लायकेशन नावाच्या प्रक्रियेतून जाते. मुळात, ही कॉलेजन आणि इलॅस्टीनला बांधते आणि त्यांना कमकुवत करते. यामुळे फाईन लाइन्स आणि सुरकुत्या दिसून येतात.

सनस्क्रीन न लावणं : सूर्यापासून निघणारे यूव्ही किरण आपल्या त्वचेवरील सुरकुत्यांसाठी सर्वात जास्त जबाबदार असतात. असुरक्षित असणाऱ्या अल्ट्राव्हायोलेट प्रकाशाच्या संपर्कात येऊन कॉलेजन खराब होऊ शकतं, ज्यामुळे फाईन लाइन्स आणि सुरकुत्या होऊ शकतात. म्हणून आपल्या त्वचेला वाचवण्यासाठी नेहमी सनस्क्रीन वापरा.

डिहायड्रेड त्वचा : आपल्या त्वचेला सुरकुत्यांपासून वाचवण्यासाठी नेहमी हायल्युरोनिक ॲसिड असणाऱ्या उत्पादनांचा वापर करावा. हे आपल्या त्वचेतील ओलावा टिकवून ठेवते, ज्यामुळे डोळ्याच्या भोवती बनणाऱ्या फाईन लाइन्स कमी होतील. तसेच स्वत:लादेखील आतून हायड्रेट ठेवा. दिवसभरातून किमान ८ ग्लास पाणी पिण्याचा नियम बनवा.

प्रत्येक व्यक्तीला दररोज पुरेशी विश्रांती मिळणे आवश्यक असते. व्यक्तीनुसार झोपेचे प्रमाण बदलत असले तरीही चांगल्या आरोग्यासाठी किमान सात तासांची झोप घेणे आवश्यक असते. ही झोप सलग असली पाहिजे. झोपेमध्ये खंड पडला तर शरीराला त्याचा फारसा उपयोग होत नाही. अनेकांना रात्री जागरण करण्याची सवय असते. मात्र, ही सवय कालांतराने आरोग्यासाठी घातक ठरू शकते. झोप पूर्ण झाली नाही तर व्यक्तीच्या शरीरावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. अपुऱ्या झोपेमुळे उद्भवणारी काही लक्षणे पाहूयात...

अपुऱ्या झोपेमुळे होतात हे त्रास

भावनिक अस्वस्थता : पुरेशी झोप न झाल्यामुळे व्यक्ती विनाकारण चिडचिड करते. बऱ्याच काळापासून शरीराला आवश्यक असणारी विश्रांती मिळाली नाही तर त्याचा परिणाम व्यक्तीच्या भावनांवर होतो. त्यामुळे व्यक्तीचा मूड सातत्याने बदलत राहतो.

विसरभोळेपणा : योग्य तितकी झोप न झाल्यास व्यक्तीमध्ये विसरभोळेपणा वाढतो. याचे प्रमाण काही वेळा इतके वाढते की अगदी काही काळापूर्वी तुम्ही केलेली गोष्टही तुम्हाला सहज आठवेनाशी होते.


नवीन गोष्टी शिकण्यात अडथळे : अपुरी झोप ही तुमच्या स्मरणशक्तीवर परिणाम करते. झोप झाली नसल्यास मेंदूला जास्त ताण द्यावा लागतो आणि त्यामुळे नवीन गोष्टी शिकण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते.

अकाली वृद्धत्व : आपण लवकर वयस्कर व्हावे असे कोणत्याच व्यक्तीला वाटत नाही. मात्र पुरेशी झोप न झालेल्या व्यक्तींच्या त्वचेवर लवकर सुरकुत्या पडतात. त्यामुळे व्यक्ती वयस्कर दिसू लागतात.

लठ्ठपणा : पुरेशी झोप न झालेल्या व्यक्तींचे शारीरिक गणित बिघडते. अन्नाचे योग्य प्रकारे पचन होत नाही. तसेच त्यांना वारंवार भूक लागण्याचीही शक्यता असते. त्यामुळे लठ्ठपणा वाढू शकतो.

कर्करोग होण्याची शक्यता : अपुऱ्या झोपेमुळे आपल्या शरीराचे नव्हे तर मेंदूचे कार्यही बिघडते. अपुरी झोप ही प्रोस्टेट कर्करोग, स्तनांचा कर्करोग यांसारख्या आजारांना कारणीभूत ठरू शकते.

कमी प्रतिकारशक्ती : अपऱ्या झोपेमुळे शरीरातील प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते. त्यामुळे अशा लोकांना संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता जास्त असते.



इन्स्टाग्रामवरून करायचा आहे का व्हिडीओ कॉल, मग फॉलो करा या स्टेप्स

इन्स्टाग्रामवर व्हिडीओ कॉलिंग हे जबरदस्त फीचर जोडण्यात आलं आहे. याच्या माध्यमातून तुम्ही व्हिडीओ कॉल करून तुमच्या मित्रांशी संवाद साधू शकता.

इन्स्टाग्राम आपल्या कंटेंट आणि फीचर्सच्या जोरावर सध्या एक लोकप्रिय सोशल मीडिया प्लॅटफॉर्म बनलं आहे. या प्लॅटफॉर्मवर फोटो आणि व्हिडीओ शेअर करण्यासोबतच व्हिडीओ कॉलदेखील करता येतो. जर तुम्हालादेखील हे फीचर वापरायचं असेल आणि जर तुम्हाला पद्धत माहीत नसेल तर टेंशन घेऊ नका. आम्ही तुम्हाला या आर्टिकलमध्ये व्हिडीओ कॉल करण्याची पद्धत सांगणार आहोत, ज्यामुळे तुम्ही तुमच्या मित्र-मैत्रिणींशी फेस-टू-फेस संवाद साधू शकता.

इन्स्टाग्राममध्ये अशाप्रकारे करा व्हिडीओ कॉल



- तुमच्या मोबाईलमध्ये इन्स्टाग्राम ॲप ओपन करा.
- उजवीकडे असलेल्या मेसेज आयकॉनवर क्लिक करा.
- चॅट लिस्टमधून तो कॉण्टॅक्ट निवडा, ज्याला तुम्हाला व्हिडीओ कॉल करायचा आहे.
- त्यानंतर उजवीकडे असलेल्या कॅमेरा आयकॉनवर क्लिक करा.
- त्यानंतर व्हिडीओ कॉल सुरू होईल.
- अशाप्रकारे तुम्ही व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून तुमच्या मित्र-मैत्रिणींशी बोलू शकता.

व्हिडीओ कॉल दरम्यान तुम्ही काय करू शकता...

- व्हिडीओ कॉलदरम्यान तुम्ही फोनचा कॅमेरा स्विच करू शकता.
- मायक्रोफोन आयकॉनवर क्लिक करून तुम्ही माइक म्यूट करू शकता.
- स्माइली फेस आयकॉनवर टॅप करून तुम्ही व्हिडीओ कॉलमध्ये इफेक्ट ॲड करू शकता.

लक्षात असू द्या व्हिडीओ कॉल करण्यापूर्वी वाय-फाय किंवा डेटा कनेक्शन सुरळीत असेल याची काळजी घ्या. ज्यामुळे तुम्ही अगदी सहज व्हिडीओ कॉलिंग करू शकाल. तसेच तुम्हाला व्हिडीओ क्वालिटीदेखील चांगली मिळेल. विशेष म्हणजे कॉलिंग दरम्यान तुम्ही ४ लोकांना जोडू शकता आणि चार लोकांशी एकाचवेळी बोलू शकता. महत्त्वाची बाब म्हणजे ज्यांना व्हिडीओ कॉल करायचा आहे, त्यांनी इन्स्टाग्राम नोटिफिकेशन ऑन केलेल्या असाव्यात, तसेच ते ऑफलाइन असल्यास व्हिडीओ कॉल नोटिफिकेशन त्यांना जाणार नाहीत. सोशल मीडिया ॲप इन्स्टाग्रामनं गेल्या वर्षी किशोरवयीन मुलांचा विचार करून नाइट टाइम नज फीचर लाँच केलं होतं. ही सुविधा रिमाइंडरप्रमाणे चालते. जेव्हा किशोरवयीन मुलं ॲपवर १० मिनिटांपेक्षा वेळ घालवतील तेव्हा त्यांना ॲप बंद करण्याचा रिमाइंडर मिळेल.

पोटाचा घेर कमी करायचा आहे? मग जाणून घ्या घोसाळी खाण्याचे फायदे

गौरी–गणपतीसारखे सण, उत्सव आले की अनेक घरांमध्ये घोसाळ्याच्या भज्यांचा वास घमघमू लागतो. साधारणपणे आपल्याला कांदाभजी, बटाटाभजी, पालकभजी असे भज्यांचे प्रकार माहीत आहेत. मात्र, या सगळ्यांमध्ये घोसाळ्याची भजीदेखील तितकीच खुमासदार लागतात. बऱ्याच वेळा घोसाळ्याची भजी खाण्यासाठी लोक नाकं मुरडतात. मात्र,



घोसाळ्याची भजी किंवा भाजी खाण्याचे अनेक फायदे आहेत. मुळात घोसाळे हे शरीरासाठी अत्यंत गुणकारी आहे. त्यामुळे त्याचे नेमके फायदे कोणते ते जाणून घेऊयात.

▮लघवी साफ होते. ▮कफ झाल्यास घोसाळ्याचा रस प्यावा. त्यामुळे उलटी होऊन कफ बाहेर पडतो. ▮पोट साफ होतं. ▮जखम बरी होते. ▮पोटाचा घेर कमी होतो. ▮मूतखड्यावर गुणकारी ▮थकवा दूर होतो.

जपा संत्र सेवनाचा मंत्र !

संत्री खाताना काळजी घ्यावी. सर्दी, खोकला झाला असेल तर अति आंबट चवीचे व कच्चे संत्रे खाऊ नये, त्यामुळे खोकला अधिकच वाढू शकतो. आंबट गोड चवीची, पिवळ्या केशरी रंगाची संत्री सगळ्यांच्या आवडीची असतात. संत्र्यात भरपूर प्रमाणत 'अ', 'ब' आणि 'क' जीवनसत्त्व असतं. साधारण थंडीत संत्र्यांचा हंगाम सुरू होतो. महाराष्ट्रात नागपूरमध्ये संत्र्याचं पीक मोठ्या प्रमाणात घेतलं जातं. संत्र्यापासून ज्यूस, जॅम, जेली, अत्तर , सुगंधी तेल, चूर्ण असे अनेक पदार्थ तयार केले जातात. पण फक्त खाद्यपदार्थ किंवा सौंदर्य पदार्थच नाही, तर आरोग्याच्या अनेक समस्यांवर संत्रे फायदेशीर आहे. चला तर या संत्र्याचे फायदे जाणून घेऊयात.

▮ भूक मंदावणे, पोटात गॅस होणे अशा समस्यांवर संत्र्याचा रस प्यायल्यास खूप आराम पडतो.

▮ मळमळल्यासारखं होत असल्यास संत्र्याची साल हुंगल्यास लगेच आराम पडतो.

▮ पचनशक्ती वाढवण्यासाठी संत्र खावे.

▮ मलावरोधाचा त्रास होत असल्यास रात्री झोपण्यापूर्वी संत्र्याच्या फोडी पांढऱ्या सालीसकट खाव्यात, सालीतील तंतुमय पदार्थामुळे शौचास साफ होते.

▮ संत्र्यामध्ये असणाऱ्या 'क' जीवनसत्त्वामुळे दातांच्या अनेक समस्या दूर होतात.

▮ थकवा, अशक्तपणा जाणवत असल्यास संत्रे खावे.

▮ हंगाम संत्री आवर्जून खावी, कारण त्वचेचे सौंदर्य सुधारण्यासाठी संत्रे मदत करते.

▮ संत्रे ही थंड असतात. अति उष्णतेचा त्रास झाल्यास संत्र्याचा रस प्यावा.

▮ संत्र्याची साल वाळवून त्यापासून चूर्ण तयार करावे. हे सूक्ष्म चूर्ण चेहऱ्यावर लावल्यास मुरुमे व पुटकुळ्या दूर होऊन त्वचा कांतियुक्त होते.



▮ संत्र्याच्या नियमित सेवनामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. पण संत्री खाताना काळजी घ्यावी, सर्दी, खोकला झाला असेल तर अति आंबट चवीचे व कच्चे संत्रे खाऊ नये, त्यामुळे खोकला अधिकच वाढू शकतो.

व्यायामापूर्वी अशी घ्या त्वचेची काळजी

आपण आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी व्यायाम करतो. पण त्यामध्ये आपल्या त्वचेची काळजी घेतली जात नाही. असे बरेच कमी लोक असतात, जे वर्क आऊट्सच्या पूर्वी आपल्या त्वचेची योग्यरीत्या काळजी घेतात. असं करणं फार महत्त्वाचं असत. कारण वर्क आऊट्सच्या दरम्यान भरपूर घाम येतो आणि जर आपली त्वचा स्वच्छ नसेल तर घाणेरड्या त्वचेवर घामामुळे बॅक्टेरिया अधिक वाढू शकतात. याशिवाय व्यायामाच्या दरम्यान आपल्या त्वचेचे निर्जलीकरण होते. चला तर मग आज आम्ही आपल्याला सांगत आहोत की, व्यायामापूर्वी त्वचेची काळजी कशी घ्यावी...



त्वचा तज्ञ म्हणतात की, जेव्हा आपण वर्क आऊटसाठी जात असाल तेव्हा मेकअपपासून शक्य असेल तेवढे वाचावे. हे आपल्या छिद्रांवर आणि घामाच्या ग्रंथींना अवरोधित करतात, यामुळे आपल्या त्वचेला श्वास घ्यायला अडचण होते. म्हणून आपण वर्क आऊट करायला जाण्यापूर्वी आपल्या त्वचेला चांगल्या प्रकारे स्वच्छ करून घ्या. यासाठी आपण एखाद्या फेसवॉशने चेहरा स्वच्छ करणे अधिक चांगले राहील.

मॉइश्चरायझिंग करणे आवश्यक

त्वचेची काळजी घेणारे तज्ञ म्हणतात की, त्वचा स्वच्छ केल्यावर तिला मॉइश्चराइझ करणे देखील आवश्यक आहे. वास्तविक वर्क आऊट्स दरम्यान आपल्या त्वचेमधून भरपूर घाम येतो, जे आपल्या त्वचेचे निर्जलीकरण करतो. अशा परिस्थितीत त्वचेचा ओलावा टिकवून ठेवण्यासाठी मॉइश्चराइझ करणं आवश्यक असतं. म्हणून जेव्हा आपण आपला चेहरा स्वच्छ कराल तेव्हा आपल्या चेहऱ्यावर मॉइश्चरायझर आणि लिप बाम लावा, कारण वर्क आऊट केल्यावर आपले ओठ कोरडे होतात आणि फाटतात.

एसपीएफ संरक्षणाला दुर्लक्षित करू नका : त्वचा तज्ञ म्हणतात की, प्री-वर्क आऊट त्वचेची काळजी घेताना सूर्याच्या किरणांपासून संरक्षण करणे देखील महत्त्वाचे आहे. जर आपण वर्क आऊट दरम्यान मैदानी व्यायाम करण्याची योजना आखत असाल, तर जसे की बागेत जाऊन धावणे किंवा बाहेरच योगा करत असाल तर बाहेर जाण्यापूर्वी सनस्क्रीन लावणे विसरू नका.



ॲंटिपर्सीपरंट लावा : हे खरे आहे की आपल्याला व्यायामशाळेत किंवा वर्क आऊट्स करताना खूप घाम गाळावा लागतो. तर आपल्या बगलेला ॲंटिपर्सीपरंट रोलऑन करून बॅक्टेरिया आणि जंताचे घर होण्यापासून संरक्षण करा.

हिवाळा ऋतू सुरू झाला की बाजारात ऊस, संत्री, गाजर, हरभरा, आवळे अशी फळे दिसू लागतात. या सगळ्यामध्ये अनेकांचं लक्ष वेधून घेतो तो म्हणजे हरभरा. हिरवागार हरभरा पाहिला की महिला वर्गाच्या डोक्यात अनेक वेगवेगळ्या भन्नाट रेसिपी घुमू लागतात. मग संपूर्ण हिवाळा ऋतू संपेपर्यंत ओल्या हरभऱ्याची चटणी, घावणं, पाल्याची भाजी असे वेगवेगळे प्रकार प्रत्येकाच्या स्वयंपाक घरात होऊ लागतात. या ओल्या हरभऱ्याचे अनेक गुणकारी फायदे आहेत. विशेष म्हणजे केवळ ओल्या हरभऱ्याचेच नव्हे, तर चणे किंवा हरभरा डाळीचं पीठ (चणाडाळीचं पीठ) हेदेखील शरीरासाठी बहुगुणी ठरत असल्याचं दिसून येतं.



हरभरा खाण्याचे 'हे' फायदे वाचून व्हाल चकित!

▮ हरभऱ्यामध्ये मॅलिक ॲसिड, ऑक्झालिक ॲसिड यांचं प्रमाण असल्यामुळे आम वांत्या (उलटी), अपचन या समस्या दूर होतात.

▮ हरभरा स्नायूवर्धक आहे. त्यामुळे व्यायाम करणाऱ्यांनी हरभऱ्याचं नियमित सेवन केल्यास फायदेशीर ठरू शकतं.

▮ ओल्या हरभऱ्याच्या पानांमध्ये लोहाचं पुरेपूर प्रमाण असतं. त्यामुळे शरीरात लोहाची कमतरता असलेल्या व्यक्तींनी हरभऱ्याच्या पानांची भाजी खावी.

▮ कोणत्याही प्रकारचा त्वचाविकार असल्यास हरभरा डाळीचे पीठ प्रभावी जागेवर लावावे.

▮ डाळीच्या पिठाने रंग उजळतो. चेहऱ्यावर मुरुमे असतील तर एक चमचा दही घेऊन त्यात थोडंसं डाळीचं पीठ घालावं. त्यानंतर हा लेप चेहऱ्यावर लावावा. यामुळे चेहऱ्यावरील मुरुमं कमी होतात.

▮ केस रुक्ष किंवा कोरडे असतील तर डाळीच्या पिठाने केस धुवावेत.

▮ घाम येऊन शरीरातून दुर्गंधी येत असल्यास अंघोळ करताना डाळीच्या पिठाचा लेप लावावा.

'या' व्यक्तींनी हरभरा खाऊ नये

▮हरभरा डाळ पचण्यास जड आहे. तसंच ती उष्ण, तुरट-गोड चवीची आहे. त्यामुळे वातदोष वाढण्याची शक्यता असते. म्हणूनच, वातप्रकृतीच्या व्यक्तींनी हरभरा डाळ किंवा हरभऱ्याचं सेवन करू नये.

▮हरभरा पचण्यास जड आहे. त्यामुळे पचनशक्ती मंद असणाऱ्यांनी किंवा अपचनाचा त्रास होणाऱ्यांनी हरभऱ्याचं सेवन टाळावं. तसंच डाळीच्या पिठापासून केलेले पदार्थ देखील जास्त खाऊ नयेत.

नावडते असले तरी आठवड्यातून एकदा कारले खावेच!

'कडू कडू कारले, बाजारात फिरले त्याला पाहून नाक भेंडीने मुरडले'. लहानपणी भाज्यांवर आधारित एका 'बडबड गीता'मध्ये कारल्याचे वर्णन अशाप्रकारे केले होते. कारले किंवा कारल्याची भाजी म्हटली की सगळेच नाक मुरडतात, पण ही कारली कितीही कडू असली तरी आरोग्य मात्र उत्तम ठेवतात. कारल्यामध्ये कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस 'अ', 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. आपल्याकडे कारल्याची भाजी सहसा कोणी करत नाही, केलीच तर मीठ टाकून तिच्यामध्ये असलेले सारे पौष्टिक घटक काढून टाकतात. कारल्यातलं पाणी काढून टाकलं की ती कमी कडू लागते, असा अनेक गृहिणींचा समज आहे. पण, यामुळे भाजीतील जीवनसत्त्व पूर्णपणे वाया जाते याची कल्पना त्यांना नसते. कारल्याला आयुर्वेदात खूप महत्त्व आहे. फक्त भाजीसाठीच नाही तर औषधांमध्येही कारल्याचा वापर केला जातो. कारले कितीही नावडते असले तरी आहारात आठवड्यातून किमान एकदा तरी या फळभाजीचा समावेश असलाच पाहिजे.

कारल्याचे फायदे

▮ कारल्याच्या रसामुळे रक्त शुद्ध होते, त्यामुळे त्वचाविकार होण्याचा धोका कमी होतो.

▮ कावीळ झाल्यास ताज्या कारल्यांचा रस सकाळ-संध्याकाळ घेतल्यास यामुळे कावीळ दूर होते.

▮ यकृताच्या सर्व विकारांमध्ये कारल्याचा रस फायदेशीर असतो.

▮ जंत किंवा कृमींचा त्रास असल्यास कारल्याची भाजी किंवा रस घेतल्यानं कृमींचा त्रास कमी होतो.

▮ दमा, सर्दी, खोकल्याचा त्रास असेल तर कारल्याचा रस व तुळशीच्या पानांचा रस एकत्र करून त्यात मध मिसळून महिनाभर घेतल्यास रोगप्रतिकार शक्ती वाढून हे त्रास दूर होतात.

निरोगी आणि सुदृढ आरोग्य हवं असेल तर आहारात पौष्टिक पदार्थांचा समावेश करा, असा सल्ला कायमच डॉक्टरांकडून दिला जातो. त्यासोबत सकाळचा नाश्ता भरपेट करावा, दुपारचं जेवण थोडं कमी करावं आणि रात्रीचं जेवण अत्यंत हलकं घ्यावं, असंही म्हटलं जातं. मात्र, अनेकदा आपण याकडे दुर्लक्ष करतो. अनेकदा काही जण रात्रीच्या जेवणात मसालेदार पदार्थ, फास्टफूड यांचा समावेश करतात.मात्र, ते शरीरासाठी अत्यंत चुकीचं आहे. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी कोणत्या पदार्थांचं सेवण करणं टाळलं पाहिजे, हे जाणून घेऊयात.

रात्री चुकूनही खाऊ नका 'हे' पदार्थ

भात : अनेकांना रात्री भात खाल्ल्याशिवाय झोप येत नाही. मात्र, रात्रीच्या वेळी भात खाल्ल्यामुळे शरीरात अतिरिक्त चरबी निर्माण होण्याची शक्यता असते. रात्री भात खाल्ल्याने पोटाकडील चरबी वाढते.

फास्ट फूड/तेलकट पदार्थ : पिझ्झा, बर्गर, फ्राईज यासारखे फास्ट फूड आणि तळलेले पदार्थ रात्रीच्या वेळी खाणे टाळा. अपचन किंवा ॲसिडिटीमुळे निद्रानाश होऊ शकतो.

चॉकलेट : काही जणांना रात्री जेवण झाल्यावर गोड खाण्याची सवय असते. त्यामुळे बऱ्याच वेळा चॉकलेट खाल्लं जातं. मात्र, चॉकलेट हे कितीही आवडीचे असले तरी झोपण्यापूर्वी ते खाऊ नका. कारण चॉकलेट्समध्येही काही प्रमाणात कॅफेन असते. तेव्हा रात्रीच्या वेळी चॉकलेटच्या अतिसेवनामुळे झोपेवर परिणाम होऊ शकतो.



मांसाहारी पदार्थ : रात्रीच्या वेळी मांसाहार पूर्णपणे वर्ज्य करावा. कारण, मांस पचायला २४ ते ७२ तासांचा कालावधी लागतो. यामुळे वजन तर वाढतेच, पण रात्री अपचनामुळे झोपमोडही होऊ शकते. तेव्हा मांसाहार करणे टाळा.

चायनीज पदार्थ : चायनीज पदार्थांमध्ये एमएसजी अर्थात मोनोसोडियम ग्लुटामेट असते. आरोग्याच्या दृष्टीने तो घातक असतोच पण त्यामुळे निद्रानाशही होऊ शकतो.

दरम्यान, रात्री जेवण केल्यानंतर एक-दोन तासांतच आपण झोपी जातो, त्यामुळे पचनक्रिया मंदावते. अशावेळी फारच कमी खाणे किंवा हलके-फुलके खाणे फायद्याचे ठरेल. अनेक पदार्थ हे पचायला जड असतात, त्यामुळे रात्री शक्यतो कमी खाण्याचा सल्ला दिला जातो. तेव्हा रात्री जेवताना काही पदार्थ खाणे हे आवर्जून टाळले पाहिजे.



पाणी जपून वापरा! २१ जूनपर्यंत टप्प्याटप्प्याने २४ तास पाणीपुरवठा बंद

केडीएमसीकडून वेळापत्रक जाहीर

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मान्सूनच्या आगमनाला झालेला विलंब आणि संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने (केडीएमसी) पाणीपुरवठ्यात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या जलसंपदा विभागाच्या निदेर्शानुसार २१ जूनपर्यंत विविध भागांमध्ये २४ तासांसाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.



भारतीय हवामान विभागाने एल निनो आणि इतर हवामानविषयक घटकांमुळे मान्सून लांबण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे राज्य सरकारने ३१ ऑगस्टपर्यंत पाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्याच्या सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर ९ जून रोजी झालेल्या आढावा बैठकीत महापालिका, एमआयडीसी आणि इतर यंत्रणांना दररोज २० टक्के पाणीबचतीचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले.

कोणत्या भागात कधी पाणीपुरवठा बंद राहणार?

▶ १२ जून २०२६ आणि १७ जून २०२६ – नेतिवली जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा बंद राहणार असून, याचा फटका डोंबिवली (पूर्व) येथील एफ आणि जी प्रभागातील नागरिकांना बसणार आहे.

▶ १३ जून २०२६ आणि १८ जून २०२६ – बारावे जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा बंद राहील. त्यामुळे कल्याण (पूर्व) येथील डी आणि ई प्रभाग, तसेच कल्याण (पश्चिम) येथील गोदरेज हिल, के प्रभागातील पार नाका आणि सुभाष मैदान टाकी परिसर प्रभावित होणार आहे.

▶ १४ जून २०२६ आणि १९ जून २०२६ – नेतिवली जलशुद्धीकरण केंद्र बंद राहणार असल्याने डोंबिवली (पश्चिम) येथील एच प्रभागातील पाणीपुरवठा खंडित राहील.

▶ १५ जून २०२६ आणि २० जून २०२६ – बारावे जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा बंद राहणार असून, कल्याण (पश्चिम) येथील बी आणि के प्रभागातील नागरिकांना याचा फटका बसणार आहे.

▶ १६ जून २०२६ आणि २१ जून २०२६ – मोहिली जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा बंद राहील. त्यामुळे मांडा-टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी आणि कल्याण ग्रामीण विभागातील इतर गावे, तसेच बी प्रभागातील योगीधाम, मिलिंद नगर, बिर्ला कॉलेज परिसर, चिकणघर, मुरबाड रोड परिसर आणि डी प्रभागातील वालधुनी परिसरातील पाणीपुरवठा प्रभावित होणार आहे.

नागरिकांना आवाहन

महापालिकेने स्पष्ट केले आहे की, ज्या दिवशी पाणीपुरवठा बंद राहणार आहे त्या दिवशी रात्री १२ ते पुढील रात्री १२ वाजेपर्यंत पूर्ण २४ तास पाणीपुरवठा बंद असेल. नागरिकांनी आवश्यक तेवढेच पाणी साठवून ठेवावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केडीएमसीकडून करण्यात आले आहे.

आरक्षित भूखंडांनी घेतला मोकळा श्वास
१२ वर्षांनंतर बांधकाम जमीनदोस्त

■मुंबई। प्रतिनिधी,



मुंबई महानगरपालिकेच्या एफ (दक्षिण) विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या धडक कारवाईत मेघवाडी, लालबाग, परळ परिसरातील शाळा व मनोरंजन मैदानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावरील ४ बांधकामांचे निष्कासन मंगळवारी करण्यात आले. हा भूखंड मोकळा करण्यासाठी मागील १२ वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. यामुळे, मेघवाडी, लालबाग, परळ आणि काळाचौकी परिसरातील सुमारे ५० हजारांहून अधिक नागरिकांसाठी मनोरंजन मैदान खुले होईल. अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या निदेर्शानुसार, उपआयुक्त (परिमंडळ-२) प्रशांत सपकाळे यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली. विकास नियोजन आराखडा-२०३४ नुसार, मेघवाडी, लालबाग, परळ आणि काळाचौकी परिसरातील मनोरंजन मैदान आणि महानगरपालिका शाळा या सार्वजनिक उद्देशाने राखीव करण्यात आले आहेत. एकूण १३ बांधकामांपैकी ०७ बांधकामांचे निष्कासित करण्यात आले आहे. तथापि, उर्वरित ०६ बांधकामांच्या निष्कासनाची कारवाई लवकरच करण्यात येईल. यामुळे, मेघवाडी, लालबाग, परळ आणि काळाचौकी परिसरातील नागरिकांसाठी मनोरंजन मैदान खुले होईल.

एसटी कर्मचाऱ्यांचे राज्यभर बेमुदत धरणे आंदोलन
२९ जूनपासून चक्काजाम आंदोलनाला सुरुवात

एसटी महामंडळासाठी शासनाने स्वतंत्र बजेट तरतूद करावी. एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन द्यावे, अशा विविध मागण्यांसाठी एसटी कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीने बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे. २९ जूनपासून राज्यभर बेमुदत धरणे आणि चक्का जाम आंदोलन करण्यात येणार आहे.राज्यातील बहुसंख्य एसटी कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीची बैठक परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासोबत पार पडली. त्यात एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक व कामगार हिताच्या प्रश्नांवर चर्चा झाली. मात्र मागण्यांबाबत समाधान न झाल्याने संघटनांनी तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आहे. पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर २९ जूनपासून मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालय, सर्व विभागीय कार्यालये तसेच सर्व मध्यवर्ती कार्यशाळांवर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. शासनाने एसटी कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न तातडीने सोडवावेत, अशी जोरदार मागणी कृती समितीने केली आहे.

एसटी कर्मचाऱ्यांच्या मुख्य मागण्या

- एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन द्यावे.
- २०१६-२०२० या वेतनकराराच्या पॅकेजदरम्यान १ टक्क्याने कमी करण्यात आलेला वार्षिक वेतनवाढीचा दर २०१६ पासून मान्य केल्याप्रमाणे पुन्हा ३ टक्के करण्यात यावा.
- औद्योगिक न्यायालयाच्या निण्यार्नुसार २०१८ पासूनची महागाई भत्त्याची थकबाकी तातडीने अदा करावी.
- राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ५८ टक्के महागाई भत्ता लागू करावा.
- एसटी महामंडळासाठी शासनाने स्वतंत्र बजेट तरतूद करावी.
- मध्यवर्ती कार्यशाळांना नवीन बसबांधणीसाठी चॅसिस उपलब्ध करून स्वमालकीच्या बसेस तयार कराव्यात.
- कामगारविरोधी चारही कामगार कायदे रद्द करावेत.
- एसटी कर्मचाऱ्यांना कॅशलेस मेडिक्लेम सुविधा लागू करावी.
- कंत्राटी भरती बंद करावी.
- महामंडळाच्या जागा पीपीपी खासगीकरणाऐवजी महामंडळानेच विकसित कराव्यात.
- भाडेतत्त्वावरील ई-बसेसऐवजी स्वमालकीच्या ई-बसेस घ्याव्यात.
- उन्नत प्रवगार्तील क. अधीकाऱ्यांना वर्ग २ कनिष्ठ अधिकाऱ्यांप्रमाणे न्याय्य वेतन लागू करावे.

१ ऑगस्टपासून एसटीत महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड बंधनकारक
सवलतीच्या प्रवासासाठी स्मार्ट कार्ड योजना, विद्यार्थ्यांसाठी नोंदणी प्रक्रियेला गती



■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवासी सेवांमध्ये डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी आणि सवलतीच्या प्रवासात पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. येत्या १ ऑगस्ट २०२६ पासून एसटी बसने प्रवास करणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी 'एनसीएमसी' (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात आले आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली असून, या निर्णयामुळे आता सवलतीचा प्रवास करणाऱ्यांकडे हे डिजिटल कार्ड असणे अनिवार्य आहे.

१ ऑगस्टच्या मुदतीमुळे राज्यभरात सध्या 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरणाच्या मोहिमेने मोठा वेग घेतला आहे. आजतागायत राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी या स्मार्ट कार्डसाठी आपली नोंदणी पूर्ण केली आहे. यापैकी सुमारे २५ लाख नागरिकांची स्मार्ट काड्र्स प्रत्यक्ष कार्यान्वित (ॲक्टिव्हेट) झाली आहेत. मात्र, उर्वरित जवळपास २६ लाख नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्डे अद्याप सुरू होण्याच्या प्रक्रियेत आहेत. ही काडेर्ही लवकरच प्रवाशांच्या हाती सोपवली जाणार असून, लाभार्थ्यांनी कोणताही विलंब न करता आपली कार्ड घेण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनातर्फ करण्यात आले आहे.

ग्रामीण आणि शहरी भागातील प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. मात्र, या कार्ड वितरणादरम्यान प्रवाशांची आर्थिक लूट किंवा गैरव्यवहार झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, तसेच अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द केला जाईल, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले. डिजिटल परिवर्तनाचे पाऊल

महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना शासनाकडून मिळणाऱ्या प्रवास सवलतींचा लाभ कोणतीही अडचण न येता मिळावा, तिकीट वाटप प्रणालीत पारदर्शकता यावी आणि एसटीचा कारभार अधिक आधुनिक व्हावा, या उद्देशाने ही 'एनसीएमसी' प्रणाली लागू केली जात आहे. एसटी महामंडळाच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने हे एक ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. त्यामुळे प्रवाशांनी १ ऑगस्टची वाट न पाहता तातडीने आपली स्मार्ट कार्डे प्राप्त करून घ्यावीत, असे आवाहन परिवहन मंत्र्यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांना मिळणार एसटीचे डिजिटल 'रुपे' कार्ड

■मिरज। प्रतिनिधी,

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विद्यार्थ्यांसह विविध सवलतधारक प्रवाशांसाठी 'रुपे ऑन द गो' ही एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) प्रणालीवर आधारित नवीन कार्ड योजना सुरू केली असून, लवकरच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी या कार्डच्या नोंदणी प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या डिजिटल व्यवहारांना चालना देण्याच्या धोरणानुसार राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सवलतीच्या प्रवासासाठी स्वतंत्र पासऐवजी आधुनिक, सुरक्षित आणि डिजिटल कार्डचा लाभ मिळणार आहे.

या योजनेची अंमलबजावणी, देखभाल आणि कार्ड वितरणाचे काम इक्विबस टेक्नॉलॉजीज लिमिटेड आणि एनएसडीएल पेमेंट्स बँक यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत असल्याची माहिती एसटी महामंडळाने दिली आहे. यापूर्वी १६ फेब्रुवारीपासून अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला सवलतधारक प्रवाशांच्या कार्ड नोंदणी व वितरण प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली असून, पुढील टप्प्यात शालेय तसेच तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या कार्डचा लाभ देण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलतीच्या मासिक पाससाठी हे कार्ड आवश्यक राहणार असून, विद्यार्थ्यांनी सरळ अथवा अपार क्रमांक तसेच त्यास जोडलेला शासकीय ओळख क्रमांक उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. या माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांची पात्रता तपासून कार्ड नोंदणी केली जाईल, अशी माहिती एसटी प्रशासनाने दिली आहे.

आगारातील किंवा बसस्थानकावरील वाहतूक नियंत्रक अथवा अधिकृत प्रतिनिधींकडून त्याची पडताळणी करण्यात येईल. या नोंदणीसाठी विद्यार्थी अथवा पालकांचा भ्रमणध्वनी क्रमांक देणेही अनिवार्य असणार आहे.

आवश्यक शुल्क भरल्यानंतर विद्यार्थ्यांना पावती देण्यात येईल. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर साधारणपणे ३० दिवसांच्या आत कार्ड छापून संबंधित आगारात उपलब्ध करून दिले जाईल. त्यानंतर पॉस मशीनद्वारे कार्ड सक्रिय करून ते विद्यार्थ्यांच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

एसटी प्रशासनाचे आवाहन

या डिजिटल कार्डमुळे विद्यार्थ्यांना प्रवास सवलतींचा लाभ अधिक सुलभ पद्धतीने मिळणार असून, भविष्यात विविध सार्वजनिक वाहतूक सेवांमध्येही त्याचा वापर शक्य होणार असल्याचा विश्वास एसटी प्रशासनाने व्यक्त केला आहे. मिरज आगाराने विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक संस्थांनी या सुविधेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक नोंदणी प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे.

बीकेसी सार्वजनिक वाहतूक मोहिमेच्या पहिल्याच दिवशी रिक्षाचालकांविरोधात तक्रारी
'मीटरने चला' म्हटलं तर ३०० रुपयांची मागणी!

■मुंबई । प्रतिनिधी,

वांद्रे-कुर्ला संकुल परिसरात सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवण्यासाठी 'साप्ताहिक सार्वजनिक वाहतूक दिन' उपक्रमाला सुरुवात झाली असतानाच रिक्षाचालकांच्या मनमानी कारभाराविरोधात प्रवाशांकडून तक्रारी समोर येऊ लागल्या आहेत. टिळक नगर, कुर्ला आणि लोकमान्य टिळक टर्मिनस परिसरात काही रिक्षाचालक मीटरने प्रवास करण्यास नकार देत अवाजवी भाड्याची मागणी करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

टिळक नगर ते बीकेसीसाठी ३०० रुपयांची मागणी

उपक्रमाच्या पहिल्याच दिवशी एका प्रवाशाने सोशल मीडियावर आपला अनुभव शेअर केला. त्यानुसार, टिळक नगर रेल्वे स्थानकाबाहेर एका रिक्षाचालकाला बीकेसी ला जाण्यास सांगितले असता त्याने मीटरने येण्यास नकार दिला आणि थेट ३०० रुपये भाड्याची मागणी केली.

परिसरात अशाच समस्या

दुसऱ्या एका प्रवाशानेही अशाच प्रकारच्या तक्रारी केल्या आहेत. लोकमान्य टिळक टर्मिनस आणि कुर्ला स्थानक परिसरात रिक्षाचालकांकडून मीटरऐवजी ठराविक रक्कम मागितली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, एलटीटी ते कुर्ला पूर्व या छोट्या अंतरासाठी मीटरनुसार साधारण ४५ ते ५० रुपये भाडे येते. मात्र काही रिक्षाचालकांकडून यासाठी तब्बल १०० रुपये आकारले जात असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.



इतकेच नव्हे तर, त्यानंतर संबंधित रिक्षाचालकाने शेअर रिक्षाचा पर्याय देत प्रत्येक प्रवाशाकडून २०० रुपये आकारण्याचा प्रस्ताव दिल्याचाही दावा करण्यात आला आहे.

मुंबई पोलिसांची दखल

ही बाब सोशल मीडियावर समोर आल्यानंतर मुंबई पोलिसांनीही त्याची दखल घेतली आहे. पोलिसांनी संबंधित तक्रार बीकेसी वाहतूक विभागाकडे पाठवण्यात आल्याचे सांगितले. "ही बाब आमच्या निदर्शनास आणून दिल्याबद्दल धन्यवाद. आवश्यक कारवाईसाठी बीकेसी ट्रॅफिक विभागाला माहिती देण्यात आली आहे," असे मुंबई पोलिसांनी आपल्या प्रतिसादात म्हटले आहे.

बीकेसी मधील वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न

दरम्यान, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने बीकेसी साप्ताहिक सार्वजनिक वाहतूक दिन उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक शुक्रवारी बीकेसी मध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना खासगी वाहनांऐवजी लोकल रेल्वे, मेट्रो, बस आणि शेअर्ड मोबिलिटी सेवांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वाहतूक कोंडी कमी करणे, प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे आणि शाश्वत प्रवासाला प्रोत्साहन देणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. मात्र, उपक्रमाच्या पहिल्याच दिवशी रिक्षाचालकांकडून मीटरनुसार प्रवासास नकार देणे आणि अवाजवी भाड्याची मागणी केल्याच्या तक्रारी समोर आल्याने या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

सक्षम ताटेचा मृतदेहासोबत लग्न करणारी आंचल अचानाक झाली गायब



■मुंबई । प्रतिनिधी,

सक्षम ताटे आणि आंचल मामीडवार यांचं प्रेमप्रकरण आपल्या सर्वांनाच माहिती आहे. प्रेमाचं लग्नात रूपांतर होण्याआधीच सक्षम ताटे याचा मृत्यू झाला. पण दोघांमध्ये प्रेम एवढं घट्ट होतं की चक्क प्रियसी आंचल मामीडवार हिने सक्षम ताटे याच्या मृतदेहासोबत लग्न केलं आणि आयुष्यभर त्याच्याच घरी राहण्याचं वचन दिलं पण आता हे वचन देणारी आंचल मामीडवार अचानक त्याचे घर सोडून गेल्याची घटना समोर आली आहे.

नांदेडची आंचल मामीडवार ही प्रियकर सक्षम ताटे याच्या मृत्यूनंतर ८ महिने त्याच्या घरी राहत होती. हे दोघे गेले ३ तीन वर्ष प्रेमसंबंधात होते. दोघांची जात वेगळी. आंचलच्या घरच्यांना ह्या दोघांचं प्रेम प्रकरण मान्य नव्हतं. त्यामुळे तिचे वडील गजानन मामीडवार आणि तिचे दोन भाऊ हिमेश मामीडवार, साहिल मामीडवार यांनी सक्षमला गोड बोलून चहा प्यायला चल म्हणून नेले आणि तिथेच त्याची हत्या केली. त्याच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. तिला दुसऱ्या दिवशी सक्षमच्या हत्येची माहिती मिळाली. त्यानंतर थेट आपल्या कुटुंबियांच्या विरोधात जात आंचल मामीडवार सक्षमच्या घरी पोहोचली. सक्षमच्या घरी त्याचा मृतदेह पाहून आंचल भावूक झाली तिच्या पायाखालची जमीन सरकली आणि तिथे थेट तिने त्याच्या नावाचे कुंकू भरले. त्याच्या आईला म्हणाली की मी आयुष्यभर तुमचा सांभाळ करेल आणि तुमची काळजी घेऊन याच घरात राहील. मी तुम्हाला कुठेही सोडून जाणार नाही, असे आंचल मामीडवार म्हणताना दिसली. आयुष्यभर तुमची साथ सोडणार नाही म्हणणारी आंचल ही गेल्या साडेतीन महिन्यांपासून एकट्या सासूला सोडून तिच्या घरी गेली.

मिळालेल्या माहितीनुसार सक्षमची आई म्हणाली तिने एकेदिवशी अचानक म्हटले की, माज्या आजीची तब्येत खराब झाली आहे, मी घरी जाते. त्यानंतर मी स्वतः तिला तिच्या घराजवळ सोडून आले. पण त्यानंतर तिचा काहीच संपर्क झाला नाही. गेल्या साडेतीन महिन्यापासून ती कुठे आहे काहीच माहिती नाही. सक्षमचे घर सोडून ती पुन्हा आपल्या घरच्यांकडे राहिला गेली की अजून कुठे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

'माझी काय चूक?'... ५ तास ट्रेन लेट झाल्यामुळे प्लॅटफॉर्म तिकीट एक्सपायर, तरुणाकडून ५०० रुपयांचा दंड, व्हिडिओ व्हायरल



■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण रेल्वे स्थानकावर घडलेल्या एका घटनेने सोशल मीडियावर चचेर्ला उधाण आले आहे. नातेवाईकांना रेल्वे स्टेशनवर सोडण्यासाठी प्लॅटफॉर्म तिकीट काढून स्थानकात गेलेल्या एका तरुणाला ट्रेन तब्बल पाच तास उशिरा आल्यामुळे जास्त वेळ थांबावे लागले. मात्र, ट्रेन उशिरा आल्याचा फटका उलट त्यालाच बसला आणि प्लॅटफॉर्म तिकीट एक्सपायर झाल्याचे सांगत तिकीट तपासनीसाने त्याच्याकडून ५०० रुपयांचा दंड वसूल केला.

ट्रेनची वाट पाहताना अडकला अन्...

मिळालेल्या माहितीनुसार, ११ जून रोजी संबंधित व्यक्ती आपल्या नातेवाईकांना रेल्वेत बसवण्यासाठी कल्याण स्थानकावर गेला होता. दुपारच्या सुमारास ट्रेन येणार असल्याने त्याने प्लॅटफॉर्म तिकीट काढून स्थानकात प्रवेश केला. मात्र, नियोजित वेळेत ट्रेन आलीच नाही. एक-दोन तास नव्हे तर तब्बल पाच तास उशिराने ट्रेन स्थानकावर दाखल झाली. त्यामुळे संबंधित व्यक्तीला नाईलाजाने स्थानकावरच थांबावे लागले. सायंकाळी सुमारे ५ वाजता ट्रेन आल्यानंतर त्याने आपल्या नातेवाईकांना निरोप दिला आणि स्थानकाबाहेर जाण्यास निघाला. यावेळी तिकीट तपासनीसाने त्याचे प्लॅटफॉर्म तिकीट तपासले. तिकीटाची २ तासांची वैधता संपल्याचे सांगत अधिकाऱ्यांनी त्याच्यावर ५०० रुपयांचा दंड ठोठावला. ट्रेन उशिरा आल्यामुळेच आपण जास्त वेळ स्थानकावर थांबलो होतो, असे सांगूनही दंड माफ करण्यात आला नाही, असा दावा संबंधित तरुणाने केला आहे.

व्हिडिओ व्हायरल, रेल्वेवर प्रश्न

संबंधित व्यक्तीने आपल्यासोबत घडलेला संपूर्ण प्रकार व्हिडिओद्वारे सोशल मीडियावर मांडला. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अनेकांनी रेल्वे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. "ट्रेन उशिरा येणे ही त्या व्यक्तीची चूक नव्हती, मग त्याच्याकडून दंड का वसूल करण्यात आला?" असा सवाल अनेकांनी उपस्थित केला आहे. काहींनी अशा परिस्थितीत प्रवाशांच्या नातेवाईकांना किंवा प्लॅटफॉर्म तिकीटधारकांना सवलत देण्यासाठी नियमांमध्ये बदल करण्याची मागणीही केली आहे.

रेल्वे नियम काय सांगतात?

रेल्वेच्या नियमांनुसार प्लॅटफॉर्म तिकीट हे २ तासांसाठीच वैध असते. ते ट्रेनच्या वेळेशी जोडलेले नसून तिकीट काढल्याच्या वेळेपासून त्याची वैधता मोजली जाते. त्यामुळे रेल्वे कर्मचाऱ्यांनी नियमांनुसारच कारवाई केल्याचे सांगितले जात आहे.

सोशल मीडियावर दोन मत

या घटनेवर सोशल मीडियावर दोन वेगवेगळी मतं समोर आली आहेत. काही जण प्रवाशाच्या बाजूने उभे राहत रेल्वे प्रशासनावर टीका करत आहेत. तर काहींच्या मते, नियम हे नियम असतात आणि त्याचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र एकूणच, रेल्वेच्या विलंबाचा फटका संबंधित व्यक्तीलाच बसल्याने ही घटना सध्या चचेर्चा विषय ठरली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com